दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -४९ शनिवार दि.२६ ऑक्टोबर २०२४ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-49 Saturday, Dt.26 October 2024 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# बीड - गेवराई - आष्टी मध्ये उमेदवारीवरून हाय ड्रामा

## परळीत धनंजय मुंडे यांच्या विरोधात संजय दौंड वाजवणार तुतारी !

## माजलगाव मध्ये आता प्रकाश सोळंकेना रमेश आडसकरांचे आवाहन ?



बीड / वैभव स्वामी

दररोज बीड जिल्ह्यातील राजकारण वेगवेगळी वळणे घेत आहे.बीड जिल्ह्यातील बीड सह गेवराई आणि आष्टी मतदार संघात उमेदवारीवरून हाय व्होल्टेज ड्रामा सुरू झालेला आहे. त्यामुळे पक्षश्रेष्ठींची डोकेदुखी वाढल्याने अद्याप उमेदवार निश्चित झालेले नाहीत.तर दुसरीकडे परळीत विद्यमान पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात कधीकाळी त्यांनीच आमदार केलेले संजय दौंड आता शरद पवार साहेबांची तुतारी हातात घेऊन परळीच्या आखाड्यात उतरणार आहेत. त्यामुळे परळी मतदार संघाची निवडणूक आता वेगळ्या वळणावर जाईल.दुसरीकडे माजलगाव मध्ये आता महायुतीचे उमेदवार प्रकाश सोळंकेना भाजपाचे गतवेळी उमेदवार असलेले रमेश आडसकर यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश करून हातात तुतारी घेतल्याने मोठे कडवे आवाहन समोर उभे राहणार आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर बीड जिल्ह्याचे राजकारण कायम हाय होल्टेज राहिलेले आहे. आता जसजशी निवडणूक पुढे सरकत आहे त्याप्रमाणे राजकीय उलथापालथ आणि राजकीय गरमागरमीचे वातावरण सुरू झाले आहे.

केज मतदार संघामध्ये विद्यमान भाजपाच्या आमदार नमिता मुंदडा आणि शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार माजी आमदार पृथ्वीराज साठे यांच्यात सरळ लढत होईल. या निवडणुकीत मुंदडांचा एकेकाळी चेला राहिलेला साठे आज गुरुनाच वरचढ ठरणार आहे. असे राजकीय चित्र उमेदवारी निश्चित होण्यापूर्वीच निर्माण झाल्याने विद्यमान आमदारांच्या अडचणीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. गेवराई विधानसभा मतदार संघासाठी महाविकास आघाडीने उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला जागा सोडली. ठाकरे सेनेने या ठिकाणी माजी आमदार बदामराव पंडित यांच्या उमेदवारीची घोषणा केल्यामुळे राजकीय वातावरण तापले आहे. दुसरीकडे त्यांच्या विरोधात महायुतीला उमेदवार जाहीर करणे तारेवरची कसरत ठरत आहे. या मतदारसंघात भाजपाचे विद्यमान आमदार लक्ष्मण अण्णा पवार निवडून आलेले आहेत. त्यामुळे राजकीय निकषाप्रमाणे महायुतीने गेवराईची जागा भाजपालाच सोडणे अपेक्षित आहे. मात्र या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आपले निकटवर्तीय निष्ठावंत अमरसिंह पंडित यांच्यासाठी शब्द देऊन विजयसिंह पंडित यांना उमेदवार म्हणून निश्चित केलेले आहे. जर ही जागा भाजपाला न सोडता महायुतीतील अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीला सोडण्यात आली तर विद्यमान आमदार लक्ष्मण अण्णा पवार उघडपणे राजकीय बंड करून आपली उमेदवारी निश्चित करणार आहेत. त्यामुळे या ठिकाणी महायुतीमध्ये संभ्रम निर्माण झालेला असून दुसरीकडे महाविकास आघाडीने भूमिका घेऊन थेट मतदारांपर्यंत सहानुभूती मिळवण्यास सुरुवात केली आहे.त्यामुळे दोघांच्या भांडणात यावेळी गेवराईत पंडितांचा विजय आमदार होतो का ? हे येणारा काळच ठरवेल.

आष्टी मध्ये उमेदवारी कोणाला द्यायची यावरून वाद टोकाला गेला आहे. माजी मंत्री सुरेश धस यांच्या निवासस्थानी हजारो कार्यकर्त्यांनी हजेरी लावून अण्णा तुम्हीच या मतदारसंघाचे उमेदवार ? अशी भूमिका घेतली. आपल्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना त्यांनी जाहीर रित्या दंड थोपटून एकदा होऊन जाऊ द्या, आष्टी मतदार संघात पक्षश्रेष्ठीने आता डोकं लावू नये. या ठिकाणी पक्षाचा अधिकृत उमेदवार महायुतीने देऊ नये. आम्ही तिघेही जे महायुतीचे इच्छुक उमेदवार आहोत ते विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे, माजी आमदार भीमराव धोंडे आणि मी स्वतः माजी मंत्री सुरेश धस असे तिघेही स्वतंत्र अपक्ष म्हणून लढतोत. जो उमेदवार निवडून येईल तो महायुतीचा असेल असे खुले आवाहनच थेट पक्षालाच दिले आहे. त्यामुळे आष्टी मतदारसंघातील पक्षांतर्गत वाद किती टोकाला गेलेला आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे या मतदारसंघात श्रेष्ठींना आपल्या पक्षाचा उमेदवार जाहीर करताना तारेवरची कसरत होणार हे नक्की. यावर कसा तोडगा काढला जाईल ?पक्ष काय निर्णय घेईल ? हे लवकरच स्पष्ट होईल. या मतदारसंघात महाविकास आघाडीने शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला जागा सोडलेली असून मोठ्या पवार साहेबांनी या ठिकाणी अल्पसंख्याक समाजातील सामान्य कुटुंबातील महेबूब शेख या तरुणाला संधी दिल्याने अनेकांच्या भुवया उंचावलेल्या आहेत. आता महेबूब मतदारसंघात काय रंग आणतात येणारा काळच ठरवेल.

माजलगाव विधानसभा मतदारसंघासाठी महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला जागा निश्चित झाली आहे.पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून सदरील जागा विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांना जाहीर झालेली आहे. त्यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर पक्षांतर्गत प्रमुख घटक असलेल्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या शिंदे सेनेच्या शहराध्यक्षांनी महायुतीचेच उमेदवार प्रकाश सोळंके यांना थेट आव्हान देत मागील अडीच वर्षात विद्यमान आमदाराने शासकीय विविध विकास कामांची उद्घाटन करताना कधीही मुख्यमंत्र्यांचा फोटो लावला नाही. आता निवडणुकीत त्यांनी मुख्यमंत्र्यांचा फोटो आपल्या प्रचारात वापरू नये.अन्यथा ज्या ज्या गाड्यांवर मुख्यमंत्र्यांचा फोटो लावला जाईल त्या गाड्या विद्यमान उमेदवारांसहित आम्ही रस्त्यावर उतरून फोडूत असा थेट इशारा दिल्याने ते महायुतीतील प्रमुख घटक पक्ष असतानाही पुढे महायुतीच्या उमेदवाराला कितपत साथ देतील ? हे आजच स्पष्ट झालेले आहे. त्यातच मराठा आरक्षण लढ्यामध्ये प्रकाश सोळंके यांना मतदारसंघात जरांगे समर्थकांनी वेठीस धरलेले होते. त्यामुळेच विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांना मी आता राजकीय संन्यास घेत असून येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत माझा पुतण्या जयसिंह सोळंके हा उमेदवार असेल ? अशी भूमिका घेऊन आपल्या विरोधकांना शांत करण्याचा डाव खेळावा लागला होता. या राजकीय खेळीमध्ये मात्र जयसिंह सोळंके निश्चितच अंतर्गत मनातून नाराज झालेले असणार.जर त्यांची नाराजी पक्षाच्या पथ्यावर पडली तर विद्यमान महायुतीच्या उमेदवाराला घरचाच मोठा आहेर मिळेल. ही सगळी राजकीय पार्श्वभूमी पाहता आणि त्यातच माजलगाव मतदार संघामध्ये शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादीने मोठा राजकीय हाबाडा देत मागील निवडणुकीमध्ये ज्या उमेदवाराने भाजपातर्फे उमेदवारी लढवली होती त्या रमेश आडसकरांच्या हातात तुतारी दिल्यामुळे या मतदारसंघात आता तुतारीचा आवाज घुमणार का ? हे येणारा काळच ठरवणार आहे.

बीड मतदार संघ हाय व्होल्टेज ड्रामा वर आलेला आहे. या मतदारसंघामध्ये महाविकास आघाडी कडून शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला जागा सोडण्यात आलेली आहे. पवार साहेबांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभेतील आमदार संदीप भैया क्षीरसागर हे मागे घडलेल्या राजकीय भूकंपामध्ये देखील आपल्या पक्षासोबत आणि नेतृत्वासोबत कायम निष्ठेने ठाम राहिले होते. त्यामुळे पक्षांतर्गत कितीही विरोध होत असला तरीदेखील संदीप क्षीरसागर यांचीच बाजू आज तरी तुलनेने जड आहे. मात्र बदलत्या राजकीय परिस्थितीमध्ये या मतदारसंघासाठी शिवसंग्रामच्या नेत्या ज्योतीताई मेटे यांनी बिनशर्थ पक्षप्रवेशानंतर ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे बीड विधानसभा निवडणूक लढवण्यासंदर्भात अचानक काल मागणी केली आहे. त्यामुळे त्या देखील आता या मतदारसंघात पक्षश्रेष्ठींच्या दृष्टिकोनातून विचार करण्यास भाग पाडणार आहेत. एवढेच नव्हे तर या मतदारसंघात उमेदवारीसाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा देखील शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश अगदी उंबरठ्यावर आलेला आहे. त्यांचा प्रवेश कालच होणार होता मात्र तो काही राजकीय अपरिहार्य कारणास्तव थांबवला गेलेला आहे. त्यामुळे या मतदारसंघात शेवटच्या क्षणापर्यंत काय निर्णय होईल हे आज सांगणे कठीण आहे. मात्र आज संध्याकाळपर्यंत किंवा उद्यापर्यंत बीड विधानसभेचे चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठान वरळी मुंबई येथील कार्यालयातून एकनिष्ठ गुरुखुदे यांना न्याय मिळणारच - वैभव वैद्य

प्रतिनिधी । मुंबई



मागील काही दिवसांपासून बीड येथील भाजपाचे जिल्हाध्यक्ष पद रिक्त असून या जागी त शहरातील नगरसेवक तथा शहराध्यक्ष राहिलेले जगदीश गुरखुदे यांना जिल्हाध्यक्ष पदाची धुरा देऊन पक्षनिष्ठा व मुंडे घराण्याबद्दल ची निष्ठा याला योग्य तो न्याय द्यावा अशी मागणी द्वारकाधीश मित्र मंडळाचे सचिव वैभव वैद्य यांनी केली आहे.

१९९६ पासून राजकारणात सक्रिय असणारे व २००१ पासून नगरसेवक म्हणून लोकप्रतिनिधित्व करणारे व भाजपा शहराध्यक्ष बीड याची जबाबदारी सक्षमपणे पार पाडणारे आमचे बंधू जगदीश गुरखुदे यांचा कार्यकाळ पाहता २००९, २०१४, २०१९, २०२४ या सर्व लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये पक्ष नेतृत्वाने दिलेली जबाबदारी सक्षमपणे पार पाडणारे तसेच २०१४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये मा, ना,

(उर्वरीत पान २ वर)

## तर अखिल वीरशैव लिंगायत महासंघ आपले उमेदवार देणार - प्रवक्ता डॉ.विजय जंगम

प्रतिनिधी । मुंबई

राज्यातील एकुण ३६ लोकसभा मतदारसंघात वीरशैव लिंगायत समाजातील सर्व जाती पोटजातींचे निर्णायक असे मतदान आहे. मात्र अशा कोणत्याही मतदारसंघात वीरशैव लिंगायत समाजाला प्रथम प्राधान्याने कोणताही राजकीय पक्ष स्थान देत असल्याचे दिसत नाही.त्यामुळे वीरशैव लिंगायत समाजाच्या उत्थानासाठी अहोरात्र कष्ट घेत असलेल्या अखिल वीरशैव लिंगायत महासंघाने, ज्या मतदारसंघात वीरशैव समाजाचे निर्णायक मतदान आहे अशा सर्व मतदारसंघात आपले उमेदवार देण्याचा निर्णय घेतला आहे असे अखिल वीरशैव लिंगायत महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा प्रवक्ता डॉक्टर विजय जंगम स्वामी यांनी जाहीर केले आहे.



देशाच्या जडण-घडणीमध्ये वीरशैव लिंगायत समाजाचे स्वातंत्र्यपूर्व काळापासून मोठे योगदान राहिलेले आहे. किंबहुना छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडात देखील त्यांच्या वित्त, सामाजिक आणि धार्मिक विभागांची जबाबदारी वीरशैव लिंगायत समाजीतील घटकांवरच असल्याचे पुरावे मिळतात. अलीकडे स्वतंत्र्योत्तर काळात देखील देशाच्या राजकीय जडण-घडणी मध्ये वीरशैव लिंगायत आणि जंगम समाजाचे महत्वपूर्ण योगदान राहिलेले आहे.मात्र नंतरच्या कालावधीत बदलत्या राजकीय पस्थितीचा फार मोठा फटका वीरशैव लिंगायत समाजालाच बसलेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर प्रारंभीचा मोजका काळ वगळता या समाजाला राज्याच्या राजकीय क्षेत्रात जाणीवपूर्वक डावलले गेले असल्याचे दिसते.आणि आता तर या समाजाचा वापर केवळ मतदानापुरताच करण्याचा फंडा जवळपास सर्वच राजकीय पक्षांनी वापरलेला आहे.दोन दिवसांपूर्वी महायुतीचा घटकपक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टीने विधानसभा २०२४ साठीची पहिली उमेदवारी जाहीर केली. जाहीर केलेल्या ९९ उमेदवारांत वीरशैव लिंगायत समाजाच्या केवळ २ व्यक्तींचा समावेश आहे आणि ते ही त्यांच्या पारंपारिक मतदारसंघात आणि एकाच विभागात हा या समाजावर झालेला निव्वळ

(उर्वरीत पान २ वर)

# जागेवरून तोडगा निघत नसेल तर सुट्ट खेळू स्वतंत्र लढण्याची परवानगी द्या

## कोण किती पाण्यात आहे हे होऊन जाऊद्या - सुरेश धस

प्रतिनिधी । आष्टी

आष्टी विधानसभेच्या जागेवरून सुरू असलेला वाटाघाटीचा तिढा सुटत नसेल तर माझी महायुतीच्या नेत्यांनी विनंती आहे घड्याळ नको कमळ नको आम्ही तिघे म्हणजे मी सुरेश धस,भीमराव धोंडे,बाळासाहेब आजबे यांना स्वतंत्र लढण्याची परवानगी द्या,कुणाची किती ताकद आहे आणि कुणाची किती पत आहे हे निकालाच्या कळेल तसेच कोण किती पाण्यात आहे हे ही दिसेल त्यामुळे एकदा होऊन जाऊद्या सूट्टा खेळ म्हणत धस यांनी गर्जना केली.



आष्टी येथील निवासस्थानी धस समर्थकांनी शुक्रवारी सकाळपासून मोठी गर्दी केली होती.गुरुवारी काही बालिश लोकांनी सोशल मीडियावर मी निवडणुकीतून माघार घेणार असल्याच्या पोस्ट व्हायरल केल्या होत्या.त्या पार्श्वभूमीवर धस समर्थकांनी आज आष्टी येथील त्यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणावर गर्दी करत घोषणाबाजी केली.या उपस्थित कार्यकर्त्यांशी बोलताना धस पुढे म्हणाले की,पहिल्या यादीत नाव यावं ही अपेक्षा होती.पक्षाच काम आत्तापर्यंत प्रामाणिक केले आहे.ज्या ठिकाणी भाजप निवडून येणार नाही अशा स्थानिक स्वराज्य संस्थेवर मी उभा राहिलो निवडून आलो माजी मुख्यमंत्री,ग्रामविकास मंत्री यांनी

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# रणधुमाळीचा एक फायदा

सध्या सुरू असलेल्या विधानसभेच्या रणधुमाळीचा एक फायदा दिसतो. तो म्हणजे या राज्यातील राजकीय घाण ढवळली जाऊन पृष्ठभागावर आली. ती पाहिल्यावर महाराष्ट्रात उगवणारा प्रत्येक दिवस कालची परिस्थिती बरी होती, अशी भावना का निर्माण करतो, ते कळेल. राजकारणाने आज तळ गाठला आहे असे वाटावे तर उद्या त्यापेक्षाही खोलवर कोणी गेलेला असतो. सध्याच्या बाजारपेठीय नव्हे; तर तद्दन बाजारू संस्कृतीत राजकीय विचारधारा, तत्त्वप्रणाली इत्यादींची अपेक्षा करण्याचा मूर्खपणा कोणीही करणार नाही, हे मान्य. तरीदेखील निदान काहीएक विचार, सभ्यता, सुसंस्कृतपणा दिसावा अशी आशा बाळगण्यात काही गैर आहे, असे नाही. पण इतकी साधी इच्छाही आपले सध्याचे राजकारण पूर्ण करू शकत नाही. ही परिस्थिती भयाण आणि भीतीदायक. कोण कोणाशी राजकीय शय्यासोबत करतो, एकत्र राहण्याच्या आणाभाका घेतो आणि एकमेकांच्या नावे घेतलेल्या शपथा हवेत विरायच्या आत दुसऱ्या दारी जातो आणि नवा घरोबा करतो. याची ना लाज दररोज नवनवी शयनगृहे शोधणाऱ्यांस ना अशा प्रवासी पक्ष्यांचे स्वागत करणाऱ्यांस! सामाजिक नैतिकतेची पातळी तर इतकी खालावलेली की 'एक दिवस, एक पक्ष' या तत्त्वाने राजकारण करणाऱ्यांचे स्वागत प्रत्येक पक्षात अगदी औक्षण वगैरे करून केले जाते. युद्धवीरच जणू! हे सारे कमालीचे उबग आणि शिसारी आणणारे आहे. अलीकडे दिवसागणिक राजकारणाचा दर्जा खालावू लागलेला आहे असे वाटू लागले त्यासही कित्येक वर्षे लोटली. परंतु महाराष्ट्रात सध्या जे काही सुरू आहे ते पाहता राजकारणाची तुलना ओसंडून वाहणाऱ्या 'क्षेपणभूमी'शी करावी किंवा काय, असा प्रश्न पडतो.

हे घराणेशाहीचे कारण एकवेळ क्षम्य ठरले असते. कारण 'गवयाचे पोर सुरातच रडते' असे वास्तव तत्त्वज्ञान आपली संस्कृती सांगते. त्यामुळे राजकारण्याच्या पोराचे/ पोरीचे पाय पक्षकार्यालयातील पाळण्यातच हलणार हे आपणास मान्य आहेच. पक्ष कार्यकर्तेच आपापल्या नेत्यांच्या पोरा/ पोरींचे पाळणे जोजावणार हेही मान्य. पण सध्या जे काही सुरू आहे ते यापेक्षाही वेगळे आणि भयानक आहे. वडील एका पक्षाचे खासदार. दोन चिरंजीवांपैकी एक त्याच वा दुसऱ्या पक्षाचा आमदार. दुसऱ्यासही तसे करणे बरे दिसणार नाही म्हणून मग दुसरे सुपुत्र तिसऱ्या पक्षात. काका एका पक्षात. पुतण्या दुसऱ्या आणि पुतण्याची बायको तिसऱ्या पक्षात. या बायकोचा भाऊ परत पहिल्या पक्षात आणि त्याचा भाऊ दुसऱ्या पक्षात. तीर्थरूप एका पक्षाचे, चिरंजीव दुसऱ्या पक्षाचे, सूनबाई तिसऱ्या पक्षाच्या आणि नातू चौथ्या पक्षात. हे काय आहे? एक पक्ष उमेदवारी देण्यास नाही म्हणाला तर हे चालले दुसऱ्या पक्षात. त्या दुसऱ्यात त्याचे स्वागत होते. मग हा बायको–मुलांसाठीही उमेदवारी मागणार. पक्ष त्यास नाही म्हणाला की बायको–मुलगा चालले तिसऱ्या पक्षात. तिसरा यातील एकास घेतो आणि दुसऱ्यास नाही म्हणतो. मग हा दुसरा चौथ्या पक्षात. एखादा पक्ष 'एक पक्ष, एक पद' असा नियम मिरवणार. तरीही दोन सख्ख्या भावांना उमेदवारी देणार. अन्य इच्छुकाने अशीच मागणी केली की हाच पक्ष त्यास नकार देणार. मग ज्यास नकार मिळाला ती व्यक्ती निघाली पुढचा दरवाजा ठोठावायला! म्हणजे व्यक्तीच्या निष्ठा ही बाब तर आता टाकाऊ झालेली आहेच. पण पक्षीय नियमही विकाऊ झालेले आहेत. हे सारे आताच बिघडले आणि पूर्वी मात्र राजकारणात सगळे सत्यवान–सावित्री होते, असे नाही. तेव्हाही आयाराम–गयाराम होतेच. सोप्या शब्दात सांगावयाचे तर पूर्वी भातात एखादाच खडा लागत असे. आता बदल म्हणायचा तर हल्ली भातात एखादेच शीत लागते; बाकी घास म्हणजे खडेच खडे! साहजिकच या 'खड्यां'ची भाषाही त्यांच्या बौद्धिक दर्जास साजेशी.

# पोलिसांच्या नाकेबंदीत बीडच्या सुभाष रोडवर पाच लाख रुपये जप्त

**प्रतिनिधी । बीड**

विधानसभा निवडणूक अनुषंगाने आज दिनांक २५ १० २०२४ रोजी दुपारी १३ १५ वाजता पोलीस ठाणे बीड शहर हद्दीमध्ये सुभाष रोडला नाकाबंदी करत असताना पोलीस नाकाबंदी पथकाला पाच लाख रुपयांची कॅश मिळून आली आहे. सदरील कॅशी जप्त करण्यात आली असून, उचित कार्यवाही पोलीस करत आहे. अनंत कैलास दहिवाळ



यांच्या ताब्यातून ही कॅश मिळाली आहे.

या संदर्भामध्ये तात्काळ ही माहिती आचारसंहिता अनुषंगाने कार्यरत असलेल्या ऋडढ पथकास ही माहिती पुरवण्यात आली आहे.. या संदर्भात पुढील कार्यवाही चालू आहे. सदरील कारवाई, श्री. अविनाश बारगळ, अपर पोलीस अधीक्षक बीड श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. विश्वांबर गोल्डे, बीड आणि पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली सपोनी बाबा राठोड परि.पोउपनि रियाज शेख पोना जयसिंग वायकर पोअं मनोज परजने पोअं अशपाक सय्यद करण्यात आली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे महाविकास आघाडीचे बदनापूर–अंबड विधानसभा मतदारसंघाचा उमेदवार म्हणून आज मा बबलू सेठ चौधरी यानी उमेदवारी अर्ज दाखल केला, यावेळी सभा आयोजित करण्यात आली. बदनापूर–अंबडची स्वाभिमानी जनता बबलु सेठ च्या पाठीशी भक्कमपणे उभी राहून 'तुतारी वाजवणारा माणूस' या चिन्हसमोरील बटण दाबून मोठ्या मताधिक्याने विजयी करा असा विश्वास मा रोहित दादा पवार यानी व्यक्त केला .यावेळी ज्येष्ठ नेते मा मंत्री राजेश टोपे साहेब, जालना जिल्ह्याचे खा.डॉ कल्याण काळे साहेब,शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख भास्करराव आंबेकर, राष्ट्रवादी कॉग्रेस शरद पवार गटाचे जिल्हा अध्यक्ष निसार देशमुख साहेब ,यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# प्रा. निखिल जाधव यांना अमेरिकेच्या प्रख्यात विद्यापीठाकडून डॉक्टरेट प्रदान

**प्रतिनिधी । माजलगांव**

फार्मसी क्षेत्रातील कार्य आणि अतुलनीय योगदानाबद्दल गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे प्रा. निखिल निळकंठ जाधव यांना अमेरिकेच्या वर्ल्ड पीस ऑफ युनायटेड नेशन, युनिव्हर्सिटी, कॅलिफोर्निया ( थझणछण) या विद्यापीठातर्फे सन्मान म्हणून होनरी 'डॉक्टरेट' हा डिग्री किताब आणि 'विश्व मानवधिकार सुरक्षा आयोग' या जागतिक संघटनेचे सदस्यत्व मिळाले आहे.

अमेरिकेतील विद्यापीठाच्या भारतीय संपर्क कार्यालयाद्वारे हा सत्कार सोहळा दिल्ली येथे आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमात बॉलीवूड सेलिब्रिटी शिल्पा शेट्टी, मनोज तिवारी, बिहार चे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी आणि केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर, सय्यद हुसेन हे सदरील कार्यक्रमाचे प्रमुख मान्यवर होते, यांच्या हस्ते हा पुरस्कार किताब वितरीत होणार होता, परंतु प्रा. डॉ. निखिल जाधव यांनी सदरील कार्यक्रमास उपस्थित न रहाता अंतरवली येथे जावून समाजसेवक संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते सत्कार आणि 'डॉक्टरेट मानद' स्वीकारली. त्याच बरोबर प्रदीप सोळंके यांनी उपरोक्त विषयाची मांडणी केली आणि मजोज जरांगे पाटील यांनी प्रा. डॉ. जाधव यांचे कौतुक केले. औषधनिर्माण शास्त्राचे उच्च शिक्षण घेतलेल्या नंतर प्रा. निखिल जाधव यांनी काही वर्ष नामांकित औषध निर्माण करणाऱ्या कंपनी मध्ये काम केले तसेच कोविड काळात ही गरजेचे औषध रुग्णांना पर्यंत पोहचविले. अचानक झालेल्या वडीलांच्या निधनानंतर निखिल जाधव यांनी कंपिनी सोडली. फार्मसीमधील विविध कंपनी मध्ये नोकरीची संधी असताना मातीशी नाळ व वडीलांसारखा आपल्या ज्ञान व अनुभवाचा वापर ग्रामीण भागातील मुलांना व्हावा म्हणून गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी येथे प्राध्यापक म्हणुन रुजू झाले. महाविद्यालयात अध्यापन करताना, वेळ मिळेल तसे वैज्ञानिक प्रयोग करून अनेक संशोधन लेख प्रकाशित केले. आज स्वतः आणि विद्यार्थ्यांसोबत त्यांचे १५ पेक्षा अधिक रिसर्च आर्टिकल नॅशनल आणि इंटरनॅशनल जर्नल मध्ये प्रकाशित आहेत तसेच त्यांनी विविध स्टेटलेव्हल, नॅशनल आणि इंटरनॅशनल सेमिनार आणि कॉन्फरनस, महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिलचे वर्कशॉप अटेंड केले आहेत. त्याचबरोबर त्यांच्या संशोधनाला भारत सरकारकडून ३ पेटंट मिळाले आहेत. गुरुकृपा इन्स्टिटयुट येथील प्राध्यापकांसमवेत त्यांचे डिप्लोमा फार्मसी मधील महत्वाच्या विषयाचे पुस्तक प्रकाशित झाले आहेत एव्हड्यावरच न थांबता त्यांचे अजूनही बरेच रिसर्च वर्क सुरू आहेत. कमी वेळेत आणि कमी वयात त्यांनी केलेल काम लक्षात घेवून अमेरिकेतील 'वर्ल्ड पिस ऑफ युनायटेड नेशन' या विद्यापीठाने कार्य गौरव करण्यासाठी जागतिक सन्मान म्हणून त्यांना डॉक्टर ही मानद उपाधी दिली आहे.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एन.ए. रणदिवे यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७६९/२०२४**
**कमलबाई व ईतर विरूध्द निरंक**
**(मार्फत अॅड. आय बी नागरे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत क्र.१ लक्ष्मण पि. बालाजी राठोड व मयत क्र.२ राजेंद्र पि. लक्ष्मण राठोड, दोघे रा. उमापुर, ता. गेवराई, जि. बीड ह अनुक्रमे दिनांक: ०५/०८/२०२४ व दिनांक: ०५/०५/२०१९ रोजी उमापुर, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार – १. कमलबाई भ्र. लक्ष्मण राठोड, वय ६० वर्षे, धंदा – घरकाम,रा.गणेश नगर, उमापुर, ता. गेवराई, जि. बीड.

२. विजय पि. लक्ष्मण राठोड, वय ४० वर्षे, धंदा–शेती, रा. गणेश नगर, उमापुर, ता. गेवराई, जि. बीड.

विरूध्द

१. उषा भ्र. राजेंद्र राठोड, वय ३८ वर्षे, धंदा – घरकाम, रा.गणेश नगर, उमापुर, ता. गेवराई, जि. बीड.

२. सोनु पि. राजेंद्र राठोड, वय २० वर्षे, धंदा – शिक्षण, रा.गणेश नगर, उमापुर, ता. गेवराई, जि. बीड.

३. नवनाथ पि. राजेंद्र राठोड, वय १८ वर्षे, धंदा–शिक्षण, रा.गणेश नगर, उमापुर, ता. गेवराई, जि. बीड.

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत क.१ लक्ष्मण पि. बालाजी राठोड व मयत क. २ राजेंद्र पि. लक्ष्मण राठोड, दोघे रा. उमापुर, यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २३/१०/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०७/१२/२०२४

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# स्त्री जीवनाचा अर्थ कृतीतून गणार्या सौ. ज्योतीताई खोडसकर

## माता–पित्याच्या स्मरणार्थ वृध्दांना अन्नदानासह केले जीवनावश्यक वस्तुंचे वाटप

**प्रतिनिधी । माजलगांव**

स्त्री...! निसर्गाला पडलेलं एक सुंदर स्वप्न...! निसर्गत:च कोमलता आणि सौंदर्याचं अभूषण लाभलेली. काही जणी निसर्गानं दिलेली ही आभूषणं सांभाळता–सांभाळता मेतकुटीला येतात, काही जणी ढाल म्हणून या आभूषणांचा वापर करतात तर, काही काही जणी निसर्गानं ही आभूषणं आपल्याला का दिली नाहीत म्हणून आयुष्यभर हळहळत असतात...! इतकाच अर्थ आहे का स्त्री जीवनाचा ? ज्यांना स्त्री जन्माचा अर्थ कळतो त्या आभाळाएवढं काम करून ठेवतात... त्यातून इतरांना प्रेरणा मिळावी आणि आपणही समाजाचे काही देणे लागतो हा भाव जागृत व्हावा हा त्यामागील हेतू असतो. असाच हेतू मागील तीन वर्षापासून माजलगावच्या सौ. ज्योती प्रकाशराव देशमुख (खोडसकर) या जोपासत आहेत. दर वर्षी त्या आपल्या मात्या–पित्यांच्या स्मरणार्थ वृध्दाश्रमातील अनाथ वृध्दांमध्ये ज्योतीताई त्यांच्या माता–पित्यांचा शोध घेत अशा लोकांसाठी अन्नदान, त्यांना नित्योपयोगी लागणार्या जीवनावश्यक वस्तू पुरवणे आदी काम करत असतात.



यंदाही सौ. ज्योतीताई देशमुख (खोडसकर) यांनी सोमवारी (दि.२३ सप्टेंबर) रोजी पाथरी तालुक्यातील ओंकार वृध्दाश्रमातील ३५ अनाथ वृध्द स्त्री–पुरूषांना अन्नदान करून, आश्रमातील या लोकांच्या भोजनासाठी खुर्च्या आणि टेबल देत आपल्या स्त्रीधर्माचे पालन केले. गेल्या तीन वर्षापासून त्यांचा हा उपक्रम अविरतपणे चालू असून भविष्यातही तो नियोजनाप्रमाणे चालूच राहिल असे ज्योतीताईंनी सदर प्रतिनिधीशी बोलताना सांगीतले. दरम्यान, त्यांच्या या उपक्रमाचे ओंकार वृध्दाश्रमाचे संस्थापक डॉ.जगदिश शिंदे यांनी कौतुक केले असून, सामाजिक बांधीलकी जोपावणारी अशी मंडळी समाजातील असतातील तर कुणी अनाथ होण्याचे काही कारणच नाही असे भावनिक मत त्यांनी व्यक्त केले. पाथरी पासून तीन किलोमिटर अंतरावर असलेल्या ओंकार वृध्दाश्रमात पार पडलेल्या आजच्या अन्नदान उपक्रमास स्व. वि.म. खोडसकर गुरू स्मृती प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. प्रकाश खोडसकर, समग्र क्रांती साप्ताहिकाचे संपादक पराग खोडसकर, प्रभुप्रसाद माध्यम समुहाचे परमेश्वर लांडगे, आंबादास देशमुख, भारतीय आयुर्विमा मंडळाचे ज्ञानोबा भोसले आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सर्व व्यवस्थापन ओंकार वृध्दाश्रमाच्या व्यवस्थापिका गीताताई सोगे आणि त्यांच्या टीमने केले.

**पान १ वरून...**

**जागेवरून तोडगा...**

सहकार्य केले.लोकसभेला देखील प्रामाणिक काम केले.२०१९ लोकसभा आणि आत्ताची लोकसभा कुणी प्रामाणिक काम केलं हे पक्षाने तपासाव.वाडी वस्ती तांड्यावर गेलो लोकांना मतदान करा म्हणून आवाहन केलं.बाकीच्यांनी कुठे सभा घेतल्या काय काम केलं याचा लेखाजोखा पक्षाला द्यावा.माझं काम लोकांना दिसतंय कुणाला सांगायची मला गरज वाटली नाही.संकटात लोकांना गरज असताना हे घरात गोधड्या घेऊन झोपले होते.कोरोणा काळात माझ्या दारात लोक मला भेटायला येत होते तेव्हा माझं दार २४ तास उघड होत.त्यावेळी आजी माजी कुठ होते.आता निवडणूक आली म्हणून जाती पातीच विष पेरायच काम सध्या इच्छुक उमेदवारांकडून केले जात आहे.माझ्या राजकीय जीवनात मी कधी कुणाची जात विचारली नाही.पण त्यात काम करणाऱ्या माझ्या सारख्या माणसाला गोवल जातंय ही फार मोठी शोकांतिका आहे..माझ्यावर तुतारीला भेटायला गेलो असा आरोप केला जातोय.एक जण तुतरीकडे जाण्यासाठी १ महिन्यांपासून उठ बशा काढत होते.आता म्हणतेत मी भेटलोच नाही आणि यात तथ्य नाही.तर दुसरीकडे एक जण मी सकाळी एकाला दुपारी एकला संध्याकाळी एकाला भेटलो असा डांगोरा पिटत आहेत.त्यामुळे अशा लोकांना

बालिश बहु बायकात बडबडला...असेच म्हणावे लागेल.लाडकी बहिण कार्यक्रमाला ४०० रुपये रोज देऊन महिला आनाव्या लागल्या.सगळं बोलणार आहे सगळं काढणार आहे मात्र ४ तारखे नंतर बोलायला सुरुवात करेन. २०१९ ला स्वतःच्या चुकांनी पडले आणि आमच्यावर खापर फोडून कटप्पा बाहुबलीच्या जाहिराती कोणी दिल्या.मग त्या बाहुबलीला सांगू इच्छितो निवडणुकीच्या काही दिवसात लागलेल्या नगरपंचायत निवडणुकीत आष्टी पाटोदा शिरूर कासार या तिन्ही नगरपंचायत कशाकाय माझ्या ताब्यात लोकांनी दिल्या.याच एकच कारण २४ तास तेवढं लोकांसाठी झिजाव लागतं.सुखात दुःखात जाव यावं लागतं.आता विधानसभेच्या निवडणुका लागल्यात आष्टी विधानसभेच्या जागेवरून सुरू असलेला तिढा अजूनही सुटला नाही.आणि तो जर सुटत नसेल तर माझी महायुतीच्या प्रमुख नेत्यांना विनंती आहे,तोडगा निघत नाही ना तर मग या मतदार संघात घड्याळ देऊ नका,कमळ देऊ नका आम्हाला तिघांना स्वतंत्र लढण्याची परवानगी द्या म्हणजे सुट्टा खेळ होईल.जो निवडून येईल त्याला त्याचा पक्ष स्वतंत्र वाहनाने मुंबईला घेऊन जाईल.अशी गर्जना करत सुरेश धस यांनी निवडणुकीत रंग भरला आहे.यावेळी हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते निवासस्थानी आले होते.

**तर अखिल वीरशैव...**

अन्याय असून आता या बाबत ठोस असा निर्णय घेण्याची गरज निर्माण झाली आहे.विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी राज्य सरकारने वीरशैव लिंगायत समाजाच्या काही मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र या टप्प्यातील मंत्रिमंडळांच्या शेवटच्या बैठकीपर्यंत वीरशैव लिंगायत समाजासाठी एकही मागणी मान्य न करता या समाजाच्या तोंडाला केवळ पाने पुसली आहेत.आता हे कदापीही खपवून घेतले जाणार नाही.राज्यसभा खासदार डॉ.अजित गोपछडेंच्या नेतृत्वाखाली काढलेल्या वीरशैव लिंगायत सन्मान यात्रेच्या नावाखाली भाजपाने या समाजाची निव्वळ दिशाभूल केली आहे.त्यामळे राज्यातील राजकीय पक्षांच्या दृष्टीने वीरशैव लिंगायत समाज केवळ मतदान करण्यापुरतेच आहेत काय ? हा प्रश्न उपस्थित होतो.

त्यामुळे या जाहीर निवेदना द्वारे राज्यातील सर्वच प्रमुख राजकीय पक्षांना ईशारा देण्यात येत आहे की, अजूनही वेळ गेलेली नाही. महाराष्ट्रात ज्या ज्या मतदारसंघामध्ये वीरशैव लिंगायत समाजाचे प्राबल्य आणि निर्णायक मतदार आहेत त्या सर्व ठिकाणी वीरशैव लिंगायत समाजाच्या लोकप्रतिनिधींना प्रथम प्राधान्य देऊन उमेदवारी द्यावी. अन्यथा राज्यातील वीरशैव लिंगायत बहुल एकुण ३६ ते ४० मतदारसंघात अखिल वीरशैव लिंगायत महासंघ स्वबळावर वीरशैव लिंगायत उमेदवार देण्याच्या तयारीत आहे.राज्यभरातील सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे प्रदेशाध्यक्ष, कार्याध्यक्ष, प्रवक्ते, विधानसभा प्रमुख असलेल्या पदाधिकार्यांना या

**पान १ वरून...**

निवेदना द्वारे विनंती वजा जाहीर आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी अखिल वीरशैव लिंगायत महासंघाच्या या मागणीचा विचार न केल्यास ज्या विधानसभा मतदारसंघात वीरशैव लिंगायत समाजाचे प्राबल्य व निर्णायक मतदान आहे अशा सर्व ठिकाणी अखिल वीरशैव लिंगायत महासंघाचे उमेदवार स्वबळावर उभे केले जातील असे अखिल वीरशैव लिंगायत महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा प्रवक्ता डॉक्टर विजय जंगम स्वामी यांनी महाराष्ट्रातील सर्व राजकीय पक्षांना आवाहन केले आहे.

**पान १ वरून...**

**लोकनेते गोपीनाथराव मुंडे ...**

पंकजाताई च्या उपस्थितीत विविध भागात २२ कॉर्नर सभा घेऊन व पोटनिवडणुकीत धोंडीपुरा भागात प्रचंड सभा घेऊन आपल्या पक्षाला वन नेतृत्वाला शक्ती देणारे जगदीश गुरखुदे यांना जिल्हा अध्यक्ष पद देऊन पक्षाने व नेतृत्वाने त्यांच्या निष्ठेला न्याय द्यावा अशी मागणी मुंडे साहेबांच्या वरळी मुंबई येथील कार्यालयात जाऊन द्वारकाधीश मित्र मंडळाचे सचिव वैभव वैद्य अशोक नरवडे गुड्डू सय्यद यांनी माजी मंत्री पंकजाताई गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या जवळ जोरदार मागणी केल्याचे प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# दिवाळी आनंदात साजरी करा – न्यायमूर्ती सुरेखा पाटील

## दिवाळी स्नेहमिलनला उस्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल सर्वांचे आभार – आणि रोहिदास येवले





**दिवाळीचा झगमगाट अनुभवला...**

दिवाळी सणानिमित्त स्नेहमिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यामुळे बीड जिल्हा न्यायालयाच्या प्रवेशद्वारा समोर दिवाळी शुभेच्छा देणारी भव्य दिव्य रांगोळी अनेकांची लक्ष वेधून घेत होते. तर न्यायालयाच्या परिसरात न्यायदान कक्षामध्ये तोरण लावून तसेच दीपोत्सव लावून दिवाळीचा झगमगाट न्यायालयीन कर्मचारी यांनी पुढाकार घेऊन केल्याने खऱ्या अर्थाने दिवाळीला सुरुवात झाल्याचा अनुभव जिल्हा न्यायालयामध्ये आला.

बीड राजयोग प्रतिनिधी

दिवाळी हा सण उत्सव म्हणून सर्वजण आनंदाने साजरा करतात. आपण सर्वांनी दिवाळी आनंदात साजरी करून स्नेहभाव वाढवावा. आपसातील गोडी कायम ठेवावी अशी भावना जिल्हा न्यायमूर्ती सुरेखा पाटील यांनी व्यक्त केली.तर दिवाळी निमित्त बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने आयोजित दिवाळी स्नेह मिलन उपक्रमाला सर्व न्यायमूर्ती, वरिष्ठ विधीज्ञानसह सर्व वकील बांधव आणि भगिनी तसेच न्यायालयीन कर्मचारी,पक्षकार यांनी उस्फुर्त प्रतिसाद दिल्याबद्दल बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने विद्यमान अध्यक्ष अँड रोहिदास येवले यांनी जाहीर आभार व्यक्त केले.

बीड जिल्हा न्यायालयाच्या नूतन इमारतीमधील सभागृहात बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने गुरुवार दिनांक २४ ऑक्टोबर रोजी दिवाळी स्नेह मिलन कार्यक्रम संपन्न झाला.दिवाळी स्नेह मिलन निमित्त दिवाळी फराळाचा आस्वाद बीड जिल्हा न्यायालयातील सर्व न्यायमूर्ती यांच्यासह वरिष्ठ विधीज्ञ आणि वकील बांधव भगिनी यांनी उत्स्फूर्तपणे घेतला. या उपक्रमाला वकील संघाचे माजी अध्यक्ष, पदाधिकारी यांनी विशेष उपस्थिती लावली. विद्यमान पदाधिकाऱ्यांमध्ये विद्यमान अध्यक्ष अँड रोहिदास येवले तसेच उपाध्यक्ष अँड नितीन वाघमारे सचिव अँड यासिर पटेल सहसचिव अँड.श्रीकांत जाधव कोषाध्यक्ष अँड गिराम ग्रंथपाल सचिव

अँड.भीमा जगताप महिला प्रतिनिधी अँड.छाया वाघमारे यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार उपाध्यक्ष अँड नितीन वाघमारे यांनी मानले.

# आदर्श इंग्लिश स्कूल जामखेड मध्ये दीपावली स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

## दीपावली सुट्टीचा आनंद पण शाळेशी काही दिवस दुराव्या मुळे विद्यार्थी झाले भावनिक

**प्रतिनिधी । अंबड**

दिवाळी हा भारतातील सर्वात लोकप्रिय सण म्हणून अद्वितीय जगप्रसिद्ध आहे. त्याचबरोबर बंधूभावा,,स्नेह,सहकार्याचे मांगल्याचे प्रतीक दिवाळी आहे. दीपावली उत्सवानिमित्त जामखेड सह संपूर्ण पंचक्रोशीत शैक्षणिक क्षेत्रात प्रसिद्ध असणाऱ्या आदर्श इंग्लिश स्कूलच्या वतीने दीपावली स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते.

संमेलनाचे उद्घाटन संस्थापक अध्यक्ष डॉ.गंगाधर पांढरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर सचिव श्रीमती आशा पांढरे, प्राचार्य आर.आर वैद्य, मुख्याध्यापिका वैशाली खिलाडे, प्रा. तुळशीराम पांढरे विराजमान होते. संमेलन निमित्त सर्व विद्यार्थ्यांनी रंगीत ड्रेस परिधान करून आल्यामुळे शाळेचा संपूर्ण परिसर अत्यंत आकर्षक दिसत होता. विद्यार्थ्यांनी तयार केलेले उत्कृष्ट आकाश कंदील व सजावट साहित्याने कार्यक्रम स्थळाची अत्यंत शोभा वाढवली. संमेलन स्थळी आकर्षक सजावट व दीप प्रज्वलित करण्यात आल्यामुळे वातावरणात प्रसन्नता व नवचैतन्य निर्माण झाले होते. त्यातच सुमधुर संगीताने कार्यक्रमात गोडवा निर्माण झाला होता.

संमेलन प्रसंगी डॉ.गंगाधर पांढरे यांनी विद्यार्थ्यांना दीपावली सण सर्वधर्मसमभाव,सहकार्य,स्नेह उन्तिगत होण्याचा, आयुष्यातील अंधकार दूर होण्याचा सण असल्याचे नमूद करत विद्यार्थ्यांना दीपावलीच्या सदिच्छा दिल्या. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना याप्रसंगी मिठाईवाटप करण्यात आली. एकीकडे दीपावली सणाचा आनंद सुट्टीचा आनंद तर दुसरीकडे सुट्टीच्या काळात काही दिवस आवडती शाळेपासून दुरावा




मित्र मैत्रिणींशी काही दिवस भेट होणार नसल्यामुळे विद्यार्थी भावनिक झाले होते.संमेलनाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन श्रीमती पल्लवी भोजने यांनी केले तर आभार प्रदर्शन अहिल्या भोजने यांनी केले. अत्यंत प्रसन्न व आनंददायी वातावरणात संपन्न झालेले हे दीपावली संमेलन प्रसंगी शाळा महाविद्यालयातील सर्व कर्मचारीवृंद,पालक विद्यार्थी उपस्थित होते

# मौजे कासारवाडी येथील शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपात जाहीर प्रवेश केला



**प्रतिनिधी । अंबड**

तालुक्यातील मौजे कासारवाडी येथील बंडू महाराज खरात, लक्ष्मण भीमराव धनाडे, कमलाकर महाराज जाधव, लक्ष्मण आप्पा साखरे, ज्ञानदेव भागवत खरात,किरण रुस्तुम जाधव, विश्वनाथ बापू धनाडे, रामेश्वर दीनानाथ नेमाने, बाबासाहेब भानुदास धनाडे, कैलास नारायण दराडे, सतीश गांडगे, कृष्णा गांडगे, नवनाथ मैंद, सोमनाथ साखरे, अर्जुन मोरे, लक्ष्मण उंबरे, घनश्याम मोरे,दत्तू जऱ्हाड, चांगदेव ढेरे, भानुदास गायकवाड,कचरु गिरे या सर्वांनी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, आमदार नारायण कुचे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला.यावेळी सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मनजित काटन येथे कापुस खरेदीस प्रारंभ

**प्रतिनिधी । धर्माबाद**

शहरातील आतुकर रोड वरील मनजित काटन येथे कापुस खरेदीस प्रारंभ करण्यात आला असून पहिल्याच दिवशी तिनशे कुंटलची आवक झाल्याची माहिती मनजित काटनचे व्यस्थापक राजेंद्र चौधरी यांनी उपोरोक्त प्रतिनिधीशी बोलताना दिली.

गुरुपुषामर्थ च्या मुहूर्तावर दि २४ आक्टोबर रोजी सकाळी ग्रेडर धरमपालजी यांच्या हस्ते विधीवत पूजा संपन्न झाली.पहिल्याच दिवशी ७१०० रुपये व ३०० कुंटल ची आवक झाली आसल्याची माहिती राजेंद्र चौधरी यांनी उपोरोक्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.यावेळी परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थिती होते.

# आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत आदिवासी समाजातील शेकडो तरुणांचा भाजपात जाहीर प्रवेश

- परतूर शहरात आमदार लोणीकरांच्या शेकडो ठिकाणी संवाद भेटी दरम्यान नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद
- वने व सांस्कृतिक मंत्री सुधीर भाऊ मनगुंटीवार यांच्या शुभ हस्ते २० हजार नागरिकांच्या उपस्थिती त
- नामनिर्देशन पत्र दाखल करणार आमदार बबनराव लोणीकर
- नामनिर्देशन पत्र दाखल करण्याकरता २०००० भाजपा समर्थक उपस्थित राहणार असल्याचा आमदार लोणीकरांचा दावा

**प्रतिनिधी । जालना**

दि. २९ऑक्टोबर २०२४ रोजी मंगळवारी वने व सांस्कृतिक मंत्री सुधीर भाऊ मनगुंटीवार यांच्या शुभ हस्ते २० हजार नागरिकांच्या उपस्थिती त परतुर विधानसभा मतदारसंघाच नामनिर्देशन पत्र सादर करणार असल्याने परतूर विधानसभा मतदारसंघातील मंठा व परतूर तालुक्यातील आणि जालना तालुक्यातील नेर सेवली जिल्हा परिषद सर्कल मधील मतदारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन महायुतीचे परतूर विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

परतूर शहरातील नामांकित वकील एडवोकेट सुरेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सोंड्या पवार कुणाल जाधव अशोक चव्हाण प्रकाश चव्हाण पंजाब काळे गजानन इंगळे राजू चव्हाण अजय पवार सचिन काळे तात्या काळे राम काळे संतोष काळे तुळशीराम काळे कटाळू चव्हाण उमेश पवार दशरथ



हिवराळे शेषराव चव्हाण राहुल पवार निलेश हिवाळे शिवाजी काळे गणेश पवार संदीप पवार अब्दुल सत्तार आसाराम पवार हनुमान पवार नीरज चव्हाण अजय काळे मंगल पवार यांच्यासह शेकडो आदिवासी समाजातील तरुणांनी लोकप्रिय लोकनेते महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत आज भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. भाजपा महायुतीची परतुर विधानसभा मतदारसंघाची अधिकृत उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आमदार बबनराव लोणीकर यांनी मतदार संघातील मंठा व परतुर तालुक्यातील झंझावती दौरा संपल्यानंतर आज २५ ऑक्टोबर २०२४ रोजी शुक्रवारी परतूर येथे श्री सतीश सोनवणे यांच्या निवासस्थानी, श्री दीपक पुरी यांच्या निवासस्थानी, श्री शिवाजी बल्लमखाणे यांच्या निवासस्थानी, मलिक कुरेशी यांच्या निवासस्थानी, श्री गणेश ठाकूर यांच्या निवासस्थानी, भगवान तात्या मोरे यांच्या निवासस्थानाजवळ मोरे मळा, आदर्श कॉलनी येथे श्री प्रकाश अंभोरे यांच्या निवासस्थानी, मोंढा भागात व श्री दिनेश कुमार होलानी यांच्या अडत दुकानावर आयोजित करण्यात आलेल्या संवाद बैठकीत उपस्थित नागरिकांशी संवाद साधला या या प्रसंगी भाजपाचे तालुकाध्यक्ष शत्रुगुण कणसे, दया काटे महाराज, डॉक्टर संजय पुरी, नगरसेवक कृष्णा आरगडे संदीप बाहेकर प्रवीण सातोणकर प्रकाश चव्हाण रवी सोळंके पद्माकर कवडे यांची उपस्थिती होती.

अर्जुन पाडेवार यांनी आयोजित केलेल्या बैठकीत प्रसंगी इजरान कुरेशी सतीश सोनवणे मलिक कुरेशी जरील शेख शेख फरान नदीम भाई काजी यांची उपस्थिती होती. तर शिवाजी बल्लम खाणे यांच्या निवासस्थानी आयोजित भाजपा कार्यकर्त्यांच्या बैठकीत प्रकाशराव दिक्षित बाळूभाऊ दशमले दीपक पुरी संदीप दादा बाहेकर बालाजी सांगोळे ओमशेठ मोर, उत्तम नाना माने विश्वनाथ बल्लम खाने शिवाजी बल्लम खाने रफिक शेख सलीम काझी यांची उपस्थिती होती.

# जमीनीच्या वादातून दोन गटात तुंबळ हाणामारी

## दोन्ही गटातील लोक जखमी

**प्रतिनिधी । धर्माबाद**

प्रॉपर्टीच्या वादातून बुधवारी दुपारी दोन गटात तुंबळ हाणामारी झाली असून दोन्ही गटातील लोक जखमी झाले आहेत. सदरील तुंबळ हाणामारीचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

येथील जन्मभूमी ते कर्मभूमी या राज्य मार्गावर महावीर चौका समोर येताळा रोडवर पांडे कुटुंबीयांची जमीन आहे. पण सदरील परीसरातील ६६ गुंठे जमीन नरहरी लक्ष्मणराव चव्हाण व विनोद देवराव बोईनवाड यांनी शेतकऱ्यांकडून खरेदी केली आहे. सदरील जमीनीचे नियमानुसार कोर्ट मोजणी करून सर्वे नंबर १४७/ ३मधील ६६ गुंठे जमीनीचा ताबा घेतला आहे. तेव्हा पासून अंदाजित ८ते १० महिन्यांपासून सदरील जमीनीचा वाद पेटला होता. व सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट झाले आहे. अशी चर्चा आहे. सदरील वाद मिटविण्यासाठी शहरातील अनेकांनी प्रयत्न केले आहेत. परंतु सदरील परीसरात पांडे कुटुंबीयांची शेत जमीन मोठ्या प्रमाणावर असून त्या शेतजमीनीवर पांडे कूटूबिंयाचा ताबा आहे. परंत पांडे कुटुंबाच्या नावावर असलेल्या सातबारा पेक्षा अधिक जमीनीवर पांडे यांचा ताबा असल्याचा दावा नरहरी लक्ष्मणराव चव्हाण व विनोद देवराव बोईनवाड यांनी केला आहे. सदरील शेत जमीन नियमानुसार मोजणी करण्यासाठी पांडे कुटुंबाना सांगण्यात आले होते. परंतु जमीन मोजणी करण्यासाठी पांडे कुटुंब टाळाटाळ करीत असल्यामुळे पांडे कुटुंबावर संशयाची सुई निर्माण होत आहे. सदरील जमीनीच्या वादावरून बुधवारी दुपारी दोन्ही गटात तुंबळ हाणामारी झाली असून दोन्ही गटातील अनेक लोक जखमी आहेत. सदरील घटनेची माहिती पोलिस निरीक्षक बाळासाहेब रोकडे व उपविभागीय अधिकारी यांना कळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन दोन्ही गटातील लोकांना हाकलून टाकले. व सदरील वादग्रस्त जागा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सदरील जमीनीवर दोन्ही गटातील लोकांना जाण्यासाठी नकार दिला आहे. दोन्ही गटातील लोकांवार गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांनी सांगितले आहे. दोन्ही गटातील लोकांचे भांडणे लावून खेळ पाहणाऱ्यांची संख्या पण जास्त असल्याचीही चर्चा होत आहे. यात त्या लोकांनी आपले चांगभले करून घेत असल्याची चर्चाही शहरातील व्यापारी, नागरिक व शेतकऱ्यांत होत आहे.

# बारसवाडा येथे मतदार जनजागृतीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन

**प्रतिनिधी । अंबड**

विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मतदार जनजागृती करण्यासाठी स्वीप कार्यक्रमातंर्गत आकाशकंदील व भेटकार्ड तयार करून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारसवाडा येथील विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृती केली. अंबड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण, शिक्षण विस्तार अधिकारी दिनेश शिनगारे,केंद्रप्रमुख रामेश्वर आंबटकर यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम शाळेत राबविण्यात येत आहेत.याच अनुषंगाने बारसवाडा येथील विद्यार्थ्यांनी दीपावलीचे औचित्य साधून भेटकार्ड तयार केले.या भेटकार्डावर मतदानाशी संबंधित घोषवाक्य,संदेश लिहून मतदार जनजागृती करण्यात आली.तसेच विद्यार्थ्यांनी आकाशकंदील तयार करून त्यावर मतदानाची निगडित घोषवाक्य लिहिले.तत्पूर्वी गावातून मतदार



जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.शालेय विद्यार्थ्यांनी मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो, उत्सव निवडणुकीचा अभिमान देशाचा, अशा घोषणा दिल्या.तसेच लसीकरण प्रसंगी मतदारांना मार्गदर्शिका वाटप करण्यात आल्या. शाळेतील विद्यार्थ्यांनी रेखाटलेली रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.या उपक्रमासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी श्रीधर कुलकर्णी व लहू गोल्हार यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी लता मुळे,गीता सुळे, कविता शेंडगे,सीमा वाईकर,अश्विनी माने,छाया शिंदे,वैशाली घाडगे आदींची उपस्थिती होती.या उपक्रमाचे शाळेचे मुख्याध्यापक कैलास जाधव,अर्जुन खोंडे,संतोष सावंत,गोकुळ बोबलट,आकाश गडवे,सुरेखा जाधव,पर्यवेक्षक संतोष नरसाळे यांनी कौतुक केले असून सर्वांनी मतदान करावे असे आवाहन मतदारांना केले आहे.



# मनजित काटन येथे कापुस खरेदीस प्रारंभ

**प्रतिनिधी । धर्माबाद**

शहरातील आतुकर रोड वरील मनजित काटन येथे कापुस खरेदीस प्रारंभ करण्यात आला असून पहिल्याच दिवशी ३०० क्विंटलची आवक झाल्याची माहिती मनजित काटनचे व्यस्थापक राजेंद्र चौधरी यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली.गुरुपुषामर्थच्या मुहूर्तावर दि २४ आक्टोबर रोजी सकाळी ग्रेडर धरमपालजी यांच्या हस्ते विधीवत पूजा संपन्न झाली.पहिल्याच दिवशी ७१०० रुपये व ३०० क्विंटलची आवक झाली.तेलंगणा राज्यातील तानुर मंडळ येळवी येथील मोरे चक्रधर यांनी सात किंटल कापस आणल्या बद्दल मनजीत काटन कडुन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थिती होते.

# परळीत आ.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओचा शुभारंभ

**प्रतिनिधी । परळी**

परळी शहरात प्रथमच खास महिलांसाठी मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओचा भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांच्या शुभहस्ते शुभारंभ करण्यात आला. सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे ह्या उपस्थितीत होत्या. आहार व व्यायामाच्या माध्यमातून आयुष्याला सुंदर बनवा भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी प्रतिपादन केले.मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओचाच्या माध्यमातून परळी व परिसरातील महिलांसाठी चांगली सुविधा उपलब्ध झाल्याने परळीकरांचे आरोग्य सुधारत असल्याचे सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी सांगितले.

परळी वैजनाथ शहरातील डॉ. देशपांडे यांच्या दवाखान्या मागे



कन्या शाळा रोड परिसरात महिलांसाठी प्रथमच मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओचा शुभारंभ भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते पार पडले. भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे यांनी सेंटरला शुभेच्छा दिल्या. कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या पत्नी सौ. राजश्री धनंजय मुंडे ह्या उपस्थितीत होत्या. याप्रसंगी बोलताना आ.पंकजाताई व सौ.राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी सर्व महिलांना मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की, आजच्या धावत्या व धकाधकीच्या जीवनात महिलांनी फक्त चूल आणि मूल याच्या पलीकडे जाऊन आपले शरीर निरोगी व आरोग्यदायी कसे राहील याचे मार्गदर्शन करताना मधुराज डान्स स्टुडिओ ला जॉईन होऊन आपले शरीर निरोगी व आरोग्यदायी ठेवावे असे आवाहन केले. याप्रसंगी आ.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, राजश्रीताई धनंजय मुंडे, मनीषाताई अजय मुंडे, प्राजक्ता ताई श्रीकृष्ण कराड, अक्षता ताई सुशील दादा कराड, संध्याताई प्रतापराव धर्माधिकारी, प्रीतीताई बालाजी मिसर या प्रमुख मान्यवरांची उपस्थितीत होत्या. तसेच शहरातील विविध व्यवसायातील व घरगुती अनेक महिला उपस्थित होत्या.

यावेळी मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओच्या संचालिका सौ.मधुरा विशाल पाठक यांनी सर्वमान्यवराचे स्वागत करून मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओ सुरू करण्यामागची भूमिका विषद केली.आहारातून आरोग्याकडे प्रत्येकाला नेण्यासाठी फिटनेस सेंटर सुरू करण्यात आले.मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओचा महिलांनी सेंटरचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. यावेळी वासुदेव अनंतराव पाठक ( मा. नगरसेवक )

सुवर्णा वासुदेवराव पाठक, दत्तात्रय विठ्ठलराव कुलकर्णी, भारतीताई दत्तात्रय कुलकर्णी मा. नगरसेविका उपस्थितीत होते.परळी शहरात महिलांसाठी प्रथमच नव्याने सुरू झालेल्या मधुराज फिटनेस ॲण्ड डान्स स्टुडिओत महिलांसाठी एरोबिक्स, स्टेप एरोबिक्स, झुम्बा, कार्डिओ, मेडिटेशन, योगा इतर वर्कआऊटस् डमबेल्स वर्कआऊट, स्टीक वर्कआऊट, लेझिम वर्कआऊट, बॉलीवुड डान्स, ३ ते १२ वयोगटातील मुला-मुलिंसाठी क्लासिकल डान्स, फोल्क डान्स, बॉलीवुड डान्स, फ्री स्टाईल डान्स झुम्बा, एरोबिक्स, मेडीटेशन, योगा आदी सुविधा असणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ मधुरा पाठक तर दीपा अमित भताने यांनी आभार मानले.

# काँग्रेस नेते रुद्रा राजू यांच्याकडून महायुती सरकारच्या भ्रष्टाचाराची चिरफाड

## काँग्रेसच्या पत्रकार परिषदेत गद्दारांचा पंचनामा  रुद्रा राजू यांच्या हस्ते प्रकाशन

**प्रतिनिधी** | माजलगांव

शहरातील राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे कार्यालय काँग्रेस भवन येथे तालुका काँग्रेसच्या वतीने जिल्ह्याचे निरीक्षक तथा अखिल भारतीय काँग्रेस केंद्रीय कार्यकारणी सदस्य श्री रुद्रा राजू यांच्या उपस्तिथीत पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी महायुती सरकारच्या भ्रष्टाचाराचा आलेख त्यांनी सादर करत गद्दारांचा पंचनामा या पत्रकाचे प्रकाशन करत पत्रकार परिषदेत महायुती सरकारच्या भ्रस्टाचाराची चिरफाड करत सविस्तर आलेख मांडला. यावेळी बोलत असताना राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हा निरीक्षक तथा अखिल भारतीय काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य श्री रुद्रा राजू यांनी सांगितले, कि दैनंदिन जीवनात सर्वसामान्य लोकांना अत्यावशक असणाऱ्या जीवनावशयक वस्तूंच्या दरात प्रचंड वाढ करून, सर्वसामान्यांचे जिवन विस्कळीत करण्याचे महापाप भाजपा आणि महायुती सरकारने केले आहे. तसेच युवावकांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून देणारे प्रकल्प राज्यातून परराज्यात घालवली असून, बेरोजगारांची घोर निराशा केली असून, मुली आणि महिलांवरील वाढत्या अत्याचारला आळा घालण्यास महायुतीचे भ्रष्ट सरकार सपसेल निकामी ठरले असून, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोकण्यास ही अपयशी ठरले आहे.




तसेच शेतकऱ्यांना शेती विषयक आवश्यक साधन आणि खते, औषधे यांच्यावर प्रचंड जि. एस. टी लादून शेतकऱ्यांचे जगणं मुश्किल केलं आहे.

याच्यामुळे विद्यार्थी, शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार, महिला सुरुक्षा, सामाजिक आणि आर्थिक समानता आबादित राहण्यासाठी भाजपाला राज्यातून हद्दपार करणे हा एकमेव उद्देश ठेऊन काँग्रेस महावीकास आघाडीच्या विजयासाठी प्रयत्नशील असून, सर्व कार्यकर्त्यांनी निवडणुकीसाठी एकादीलाने काम करावे असे आव्हान पत्र परिषदेत जिल्हा काँग्रेसचे निरीक्षक तथा अखिल भारतीय काँग्रेसचे वर्किंग कमिटीचे सदस्य श्री रुद्रा राजू यांनी आव्हान केले. यावेळी या पत्रकार परिषदेस श्री रुद्रा राजू यांच्या समवेत काँग्रेसचे जेष्ठ नेते नवनाथ थोटे, युवक काँग्रेसचे सरचिटणीस राहुल टेकाळे, तालुकाध्यक्ष नारायण होके, पक्षाच्या अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे, शहराध्यक्ष अफरोज तांबोळी, कार्यलय प्रमुख शेख अहेमद, ऍड. इनामदर,महावीर मस्के,समिउद्दीन अन्सारी, शेखजाणूशहा,सह काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजेभाऊ... तुम्ही लढा, मी तुमच्यासाठी नक्की परळीला येतो

## युवक नेते राजेभाऊ फड यांनी घेतली सपा नेते आ.अबू आझमी यांची भेट

**प्रतिनिधी** | परळी

राजेभाऊ... निकालाची काळजी करू नका. जनतेचे तुमच्यावर प्रेम आहे. तुमची मतदारसंघात सर्वत्र चांगली ओळख असून एक सुशिक्षित विकासाभिमुख नेतृत्व म्हणून जनता तुमच्याकडे आशेने पाहते. तुम्ही लढा, विजय नक्की आहे. तुमच्या संघर्षाच्या काळात मी नक्की परळीला येईन असे आश्वासन समाजवादी पक्षाचे महाराष्ट्राचे नेते अबू आझमी यांनी राजेभाऊ फड यांना दिले. मुंबई येथे आज शुक्रवारी त्यांची फड यांनी सदिच्छा भेट घेतली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी शुक्रवारी समाजवादी पार्टीचे महाराष्ट्राचे नेते अबू आझमी आ.अबू आझमी यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीत त्यांची विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने अनेक विषयांवर सखोल चर्चा



झाली. यावेळी संवाद साधत असताना आ.अबू आझमी यांनी राजेभाऊ फड यांना परळीला येण्याचे आश्वासन दिले. ते म्हणाले की, राज्यातील जनता परिवर्तनाच्या मानसिकतेत असून, महाविकास आघाडीला अनुकूल असे वातावरण निर्माण झालेले आहे. तुमचे परळी मतदार संघातील सामाजिक काम मी चांगलच ऐकून असून, तुम्हाला या मतदारसंघातील जनता आमदार करण्यास उत्सुक आहे. त्यामुळे तुम्ही लढा मी तुमच्यासाठी नक्कीच परळीला येईन असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात रमेश आडसकर यांचा प्रवेश



**प्रतिनिधी** | अंबाजोगाई

माजलगाव मतदारसंघात अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवार घोषित झाल्यानंतर शरद पवारांच्या घोषणेकडे सर्वांचे लक्ष होते. काल ही प्रतिक्षा संपली असून भाजप नेते रमेश आडसकर यांनी शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षात प्रवेश केला. यामुळे आता माजलगावमधून निवडणूक रिंगणात रमेश आडसकर यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. रमेश आडसकर यांची भाजप नेत्या आ. पंकजा मुंडे यांचे समर्थक म्हणून ओळख आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून शरद पवारांकडून माजलगाव मतदारसंघात उमेदवारांची चाचपणी सुरु होती. माजलगाव मतदारसंघासाठी भाजपाचे मोहन जगताप व रमेश आडसकर यांचे नाव अनेक दिवसांपासून चर्चेत होते. विद्यमान आमदार प्रकाशदादा सोळंके यांनाच पुन्हा उमेदवारी देवून अजित पवारांनी तगडे आवाहन उभे केले.यामुळे आता तुतारी कोण वाजविणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. दि २५ शुक्रवारी रमेश आडसकर यांनी मुंबई येथे शरद पवार यांची त्यांच्या सिल्वर ओक निवासस्थानी भेट घेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. रमेशराव आडसकर यांनी २०१९ मध्ये भाजपाकडून माजलगाव मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. यात ते अल्पमतांनी पराभुत झाले होते. आडसकरांची ओळख माजी मंत्री आ.पंकजा मुंडे यांचे निकटवर्तीय व कट्टर समर्थक म्हणून होती. आडसकर आता माजलगाव मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे अधिकृत उमेदवार असणार असल्याचे सांगितले जात आहे. रमेश आडसकरांनी गेली पाच वर्ष मतदारसंघात संपर्क ठेवल्यामुळे आता माजलगाव मतदारसंघात निवडणूकीची रंगत वाढणार आहे अशी चर्चा आहे.

# आष्टी मतदार संघातून महेबूब शेख यांनी फुंकली तुतारी

## आष्टी तालुक्यात महेबुब शेख यांचे जोरदार स्वागत जेसीबीतुन पुष्पवृष्टी, कार्यकर्तांचा जल्लोष

**प्रतिनिधी** | आष्टी

गिल अनेक दिवसांपासून आष्टी विधानसभा मतदारसंघात तुतारीची उमेदवारी कोणाला मिळणार याविषयी मोठा संभ्रम निर्माण झाला होता.महाविकास आघाडी कडून इच्छुक असणारे जवळपास सर्वच इच्छुक उमेदवार मुंबईला ठाण मांडून बसले होते. परंतु महाविकास आघाडी कडून आष्टी विधानसभा मतदारसंघात महेबुब शेख यांना अखेर तुतारी फुंकण्याची संधी मिळाली आहे. उमेदवारी मिळाल्यानंतर आष्टी विधानसभा मतदारसंघात महेबुब शेख यांचे जोरदार स्वागत करण्यात आले, जोरदार घोषणाबाजी करत ढोलताशांच्या गजरात जेसीबीतुन पुष्पवृष्टी करत जल्लोषात महेबुब शेख यांचे स्वागत झाले.

आष्टी विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची अधिकृत उमेदवारी महेबुब शेख यांना काल जाहीर झाल्यानंतर आष्टी




येथे कार्यकर्त्यांनी सायंकाळी फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोष साजरा करण्यात आला. आज सकाळी मतदार संघात महेबुब शेख यांचे सकाळी धानोरा येथे आगमन झाले. ढोलताशांच्या गजरात जोरदार स्वागत करण्यात आले. त्यानंतर धानोरा येथील चौकाचौकात रॅली काढून महापुरुषांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. कडा येथे ही जोरदार स्वागत झाले. आष्टी शहरात स्वागतासाठी जेसीबीतून महेबुब शेख यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली, फटाक्यांची आतिषबाजी ढोलताशांच्या गजरात रॅली किनारा चौकापासून आण्णाभाऊ साठे यांना चौकात अभिवादन करून झाली पुढे स्व. गोपीनाथ मुंडे चौकात मुंडे साहेबांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे महाराजांना अभिवादन करण्यात आले. आष्टी शहरातील सर्व चौकाचौकात महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. यावेळी महेबुब भाई तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह होता. यावेळी तालुकाध्यक्ष परमेश्वर शेळके, सुनिल नाथ, विजय गाढवे, राहुल काकडे, दादासाहेब झांजे, दिपक होले, ड. रिजवान शेख, नदिम शेख, नगरसेवक भिमराव गायकवाड, अंकुश खोटे, जिशान सय्यद, अमोल चव्हाण, भाऊसाहेब मेटे, संतोष सानप, अतुल शिंदे, तौफिक शेख, भैरव चव्हाण, सचिन गोंदकर, सोमनाथ निकाळजे, अंबादास पवार, राजेसाहेब निंबाळकर, सचिन पवार, लहू भवर, शिवाजी शेळके, दत्तात्रय कांबळे, फरमान शेख, माऊली कांबळे, सुधाकर भगत, सोहेल बेग,जमीर पठाण, अस्लम मोगल,जल्लाल शेख, हाफिज मोसिम सय्यद, मुजामिल शेख, अरबाज बेग, महम्मद शेख आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले होते.

# पुणे येथे इंडियन मेडिकल असोसिएशनचा 'कलादर्पण २००२४' राज्यस्तरीय सांस्कृतिक सोहळा उत्साहात व जल्लोषात साजरा

## सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांची माहिती

**प्रतिनिधी** | अंबाजोगाई

इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्याच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध राज्यस्तरीय स्पर्धांचे पारितोषिक वितरण व गुणदर्शन कार्यक्रम नुकताच पुणे येथे संपन्न झाल्याची माहिती सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष तथा अंबाजोगाई येथील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी दिली.

या कार्यक्रमास संघटनेचे प्रदेश अध्यक्ष डॉ.दिनेश ठाकरे,नियोजित अध्यक्ष डॉ संतोष कदम ,सचिव डॉ सौरभ संजनवाला,कोषाध्यक्ष डॉ विक्रांत देसाई, इंडियन मेडिकल असोसिएशनचे पुणे शाखेचे अध्यक्ष डॉ.रंजन संचेती, डॉ.राजेश इंगोले अध्यक्ष, सांस्कृतिक समिती महाराष्ट्र राज्य, डॉ संजय पाटील,डॉ नवरंगे, सचिव डॉ वीरेंद्र ओस्टवाल, उपाध्यक्ष डॉ.वैजयंती पटवर्धन, सहसचिव डॉ मीनाक्षी कुलकर्णी, डॉ संतोष कुलकर्णी, डॉ गीतांजली शर्मा,डॉ तुकाराम मुंढे, डॉ मोहिनी गानू, डॉ वृंदा कुलकर्णी, डॉ राजेश्री सावंत, डॉ पल्लवी दोडके, डॉ प्रज्ञा किनगावकर , डॉ राजन जोशी ,डॉ माया भालेराव यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. सौरभ संजनवाला, डॉ.राजेश इंगोले,डॉ संतोष कदम, डॉ.संजय पाटील,डॉ वैजयंती पटवर्धन, डॉ मीनाक्षी कुलकर्णी, डॉ.संतोष कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करून करण्यात आली.




कार्यक्रमाचे प्रास्तविक करताना आयएमएचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी आय एम ए महाराष्ट्र तर्फे सलग दुसऱ्या वर्षी कलादर्पण २०२४ हा कलाउत्सव महाराष्ट्रातील सर्व डॉक्टर्स साठी आयोजित केला आणि व्यस्त असणाऱ्या डॉक्टर्सनी या महोत्सवात प्रचंड संख्येने सहभागी होऊन याचा आनंद घेतला. महाराष्ट्रातील डॉक्टर्ससाठी या सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. आपल्या दैनंदिन धकाधकीच्या जीवनात ताणतणाव विसरून इतक्या प्रचंड संख्येने डॉक्टर्स सहभागी झाले हेच या आयोजित कार्यक्रमाचे फलीत आणि यश असल्याचे सांगितले. कला ही माणसाच्या जगण्यात उतरली पाहिजे आणि जीवनातील ताणतणाव कमी करण्यासाठी प्रत्येकाने एखादी कला जोपासली पाहिजे असे मत व्यक्त केले. तर संघटनेचे राज्याचे सचिव डॉ.सौरभ संजनवाला यांनी इंडीयन मेडीकल असोसिएशन सांस्कृतिक समिती तर्फे आयोजित या गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, छायाचित्र स्पर्धा, नृत्यस्पर्धा,रिल्स स्पर्धा , काव्य लेखन स्पर्धा इतक्या मोठ्या प्रमाणात यशस्वी केल्याबद्दल सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांचे अभिनंदन करीत डॉ.राजेश इंगोले यांनी या पुढील काळात सुद्धा अशा बहारदार कार्यक्रमांचे आयोजन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावर्षी घेण्यात आलेल्या या स्पर्धा न भूतो न भविष्यती अशा प्रकारे आयोजित करण्यात आल्या आहेत असे गौरवोद्गार काढत आयएमए ही संघटना खऱ्या अर्थाने डॉक्टर्सच्या सुखदुःखात सदैव सहभागी असते असे प्रतिपादन केले. पुणे स्थानिक शाखेचे अध्यक्ष डॉ राजन संचेती यांनी डॉ राजेश इंगोले हे उत्साहाचं अजब रसायन आहे जे कार्य हाती घेतात ते केवळ तडीस नेतात अस नाही तर पूर्ण ताकतीने स्वतःला त्यात झोकून देऊन त्या कार्याला नवीन आयाम देतात. कलादर्पण २०२४ वर्ष दुसरे पुणे येथे आयोजित करण्याचे सौभाग्य पुणे शाखेला मिळाले आहे त्याबद्दल संघटनेचे आभार मानले. डॉ संतोष कदम यांनी डॉक्टर्स हे धरती वरील देव मानले जातात पण, वस्तुस्थितीत डॉक्टर्स ही सर्वसामान्य व्यक्ती असते. दैनंदिन ताणतणाव, प्रश्न, समस्या त्यालाही असतात त्यामुळे त्यांनाही या ताणतणावापासून मुक्ती हवी असते आणि या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजनातून आणि समोर उपस्थित डॉक्टर्सची संख्या पाहता डॉ.राजेश इंगोले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हा हेतू साध्य केल्याचे दिसून येते. उपस्थित डॉक्टर्स आपआपल्या विषयांत तर तज्ज्ञ आहेतच पण, त्यांनी यावेळी ज्या कला सादर केल्या आहेत,त्यामुळे आम्हीही अचंबित झालो असल्याची प्रांजळ कबुली देत डॉक्टर्स ही उत्तम गायक, संगीतकार, फोटोग्राफर, चित्रकार, उत्कृष्ट नर्तक ,कवी कवयित्री ,रिल्स स्टार असू शकतात हे या कलादर्पण २०२४ सांस्कृतिक सोहळ्याने दाखवून दिल्याचे मत व्यक्त केले. यावेळी इंडीयन मेडीकल असोसिएशन तर्फे घेण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन सूत्रसंचालन डॉ. गीतांजली शर्मा तर आभार प्रदर्शन डॉ राजन जोशी यांनी केले. कार्यक्रमाच्या

# भीमराव धोंडे यांनी केलेल्या शैक्षणिक विकासामुळे गोरगरिबांची मुले उच्च शिक्षित - नानाभाऊ वाडेकर

**प्रतिनिधी** | आष्टी

आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांच्यामुळे मतदारसंघाच्या विकासाबरोबर शैक्षणिक विकासही मोठ्या प्रमाणात झाला आहे, त्यांच्यामुळे ग्रामीण भागातील वाड्या-वस्तीवरील गोरगरिबांचे मुले मुली उच्चशिक्षित बनली आहेत. मतदारसंघाचा यापेक्षाही जास्त शैक्षणिक विकास करण्यासाठी विधानसभा निवडणुकीत मतदारांनी त्यांना सहकार्य करावे असे आवाहन पुंडी येथील जेष्ठ कार्यकर्ते नानाभाऊ वाडेकर व्यक्त केले.



याबाबत अधिक माहिती देताना नानाभाऊ वाडेकर यांनी सांगितले की, आष्टी, पाटोदा, शिरूर हा कायमस्वरूपी दुष्काळी भाग आहे. पुर्वी आष्टी तालुक्यात एक - दोन माध्यमिक शाळा व एकमेव वरिष्ठ महाविद्यालय होते. सर्वसाधारण शेतकरी कुटुंबात वाढलेले भीमराव धोंडे हे १९८० साली विधानसभेवर निवडून गेल्यानंतर ते सलग पंधरा वर्षे विधानसभा सदस्य राहिले, त्यांनी शैक्षणिक संस्थांचे जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आज गावागावात, ग्रामीण भागात, डोंगरी भागात त्यांनी सुरू केलेल्या शाळामधून हजारो विद्यार्थी, विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. तसेच हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन पुढे उच्चशिक्षित होऊन शहरात नोकरी आणि व्यवसाय करीत आहेत. माजी आ. भीमराव धोंडे यांनी सुरू केलेल्या शाळामुळे खेड्यापाड्याचे मुले शिकले आहेत. त्यापूर्वी ग्रामीण भागातील पालक आपल्या मुला मुलींना विशेष करून मुलींना नगर, पुणे, संभाजीनगर या ठिकाणी शिक्षणासाठी पाठवत नव्हते. ठराविक पालकच आपल्या पाल्यांना बाहेर शिक्षणासाठी पाठवत होते,परंतु माजी आ. भीमराव धोंडे यांनी गावागावात शाळा सुरू केल्या. कडा, आष्टी, धानोरा, तिंतरवणी , अंमळनेर येथे वरिष्ठ महाविद्यालय सुरू केले

तसेच आष्टीत कृषी, वैद्यकीय इंजीनियरिंग, फार्मसी असे सर्व प्रकारचे महाविद्यालये आष्टी येथे सुरू केल्याने तालुक्यातील खेड्यापाड्यातील मुले मुली उच्चशिक्षित बनले आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी शैक्षणिक विकासाबरोबर वीस वर्षे विधानसभा सदस्य असताना मतदारसंघाचा चांगला विकास केला आहे. गावागावात पाझर तलाव केले. गांव, वाड्या, वस्त्या चांगल्या रस्त्याने जोडले आहेत असा सार्वजनिक विकास मोठ्या प्रमाणात केला आहे. त्यामुळे या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी माजी आमदार भीमराव धोंडे यांना मतदानाच्या रुपाने सहकार्य करण्याचे आवाहन वाडेकर यांनी केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# राज्य शासनाच्या मोफत गणवेशाच्या मापात पाप

## विद्यार्थ्यांना एकाच मापाचा गणवेश तर मुलांना हाफ पॅन्ट तर मुलींना ओढणीच नाही :- डॉ.गणेश ढवळे

**प्रतिनिधी । बीड**

राज्य शासनाच्या एक राज्य,एक गणवेश योजनेचा पुरता बोजवारा उडाला असुन १५ जुन रोजी शाळा सुरू होऊन तब्बल सव्वा ४ महिन्यानंतर शाळेतील मुलांना दोन पैकी एकच गणवेश मिळाला असुन जिल्हा परिषदेच्या पहिली ते आठवीच्या अनेक विद्यार्थ्यांना गणवेश मिळाला नाही आता दोन पैकी फक्त एक गणवेश मिळाला असुन तो सुद्धा परीधान करण्यासारखा नाही.कारण विद्यार्थ्यांचे माप न घेताच एका वर्गातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना एकाच मापाचे गणवेश दिले आहेत.त्यामुळे कुणाला आखुड तर कोणाला मोठा ( ढगळ) झाला आहे. त्यातच पाचवी ते आठवी पर्यंत विद्यार्थ्यांना हाफ पॅन्ट व मुलींना ओढणीच देण्यात आली नाही त्यामुळे एकंदरीतच शासनाच्या गणेवेशाच्या मापातच पाप असल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

समग्र शिक्षा अभियान अंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश दिला जातो.मागील काही वर्षांत शाळा व्यवस्थापन समितीकडुनच गणवेशाचे कापड खरेदी करून गणवेश शिवुन दिला जात होता.यामध्ये इयत्ता चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शर्ट, हाफपन्ट दिली जात होती तर पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना फुलपन्ट दिली जात होती.मात्र शासनाने यावर्षी मुंबईत निविदा काढुन गणवेशाचे कापड पुरवले.त्यानंतर महिला आर्थिक विकास महामंडळाकडुन गणवेश शिवुन वाटप केले जात आहेत.



यावर्षी पुरविण्यात आलेल्या गणवेशामध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शर्ट व हाफ पॅन्टचा पुरवठा करण्यात आला आहे.तर विद्यार्थ्यांनींना ओढणी देण्यात आली नाही.त्यामुळे विद्यार्थी हाफ चड्डी परीधान करून शाळेत जाण्यास नाखुष आहेत.परीणामी अनेक विद्यार्थी गणवेश मिळुनही ते शाळेत गणवेश घालूनच येत नसल्याची वस्तुस्थिती पोखरी (घाट) येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक विलास पाखरे यांनी बोलून दाखवली. याचवेळी पोखरी (घाट) येथील शाळेची पटसंख्या १५१ असताना केवळ १२७ मुलांना गणवेश मिळाला असुन आठवीच्या विद्यार्थी विद्यार्थिनींना अद्याप गणवेश मिळालाच नाही.

**शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांचे लेखी आश्वासन हवेतच विरले - डॉ.गणेश ढवळे**

शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) भगवान फुलारी यांनी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात स्काऊट व गाईड विषयास अनुरूप गणवेशासाठी कापड तालुकास्तरावर प्राप्त झाले असुन सदरील कापड विद्यार्थी संख्या निहाय शाळा निहाय वितरीत करण्यात येणार असल्याच्या सुचना गटशिक्षणाधिकारी यांना दिल्या आहेत.त्यामुळे आंदोलन मागे घेण्यात यावे असे लेखी कळवले होते.मात्र या घटनेला १५ दिवस उलटुनही अद्याप दोन पैकी एकच गणवेश मिळाला असुन तो सुद्धा वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना एकाच मापाचा शिवल्याने काहींना आखुड तर काहींना ढगळ येत आहे. पाचवी ते आठवीच्या मुलांना हाफ पॅन्ट तर मुलींना ओढणीच नाही.मात्र. गेल्यावर्षी पर्यंत शाळा व्यवस्थापन समिती मार्फत देण्यात येणाऱ्या गणवेशात मुलांना फुलपन्ट तर मुलींना ओढणी देण्यात येत होती. त्यामुळे गतवर्षी प्रमाणेच गणवेशाचे कामकाज शालेय व्यवस्थापन समिती मार्फत करण्यात यावे अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# महाविकास आघाडीच्या वतीने चंद्रकांत दानवे यांचा उमेद्वारी अर्ज दाखल

## मतदार संघातून हजारोच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित

**प्रतिनिधी । जालना**

दि.२५ भोकरदन जाफराबाद विधानसभा मतदारसंघ १०३ सर्वत्रिक निवडणूक २०२४ विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महाविकास आघाडीचे उमेदवार मा. आमदार चंद्रकांत पा.दानवे यांचा दि.२५ रोजी उमेद्वारी अर्ज दाखल करण्यात आला. उमेद्वारी अर्ज दाखल करण्यासाठी मतदार संघातील कार्यकर्ते हजारोच्या संख्येने उपस्थित होते. व्यासपीठावर यावेळी महाविकास आघाडी तथा राष्ट्रवादीचे युवा नेतृत्व आमदार रोहित पवार, बीडचे माजी खासदार जयसिंगराव गायकवाड, जालना लोकसभेचे खासदार डॉ कल्याणराव काळे,राजेश टोपे,राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा अध्यक्ष निसार देशमुख, बदनापूर चे उमेद्वार बबलु चौधरी, काँगेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख,





शिवसेना उपजिल्हा प्रमुख रमेश पा. गव्हाड, जिल्हाध्यक्षा सुरेखा लहाने, बाळासाहेब वाकुळनिकर, संजय काळबांडे, रामधन कळंबे, कुंडलिक मुठ्ठे, ज्ञानेश्वर शिंदे,नवनाथ दौंड, रमेश सपकाळ,आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी रोहित पवार, चंद्रकांत दानवे सह अनेक मान्यवरांची भाषणे झाली, त्यात रोहित पवार हे कार्यकर्त्यांना संबोधित करताना पुढे म्हणाले की, तुमच्या मतदारसंघातील अनेक प्रश्न आजही भेडसावत असून,पिण्याच्या पाण्याची समस्या,ऊस कारखान्याची समस्या,किंवा शेती सिंचनाची व्यवस्था असेल, सत्ताधाऱ्यांनी एवढे वर्षे सत्ता भोगून देखील,या कुठल्याही गोष्टीवर कायमस्वरूपी तोडगा काढला नाही.त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत तुमच्या हक्काच्या माणसाला विधानसभेत पाठवण्यासाठी, कोणत्याही आमिषाला बळी न पडता, मतदान करावे व खूप मोठ्या मताधिक्याने चंद्रकांत दानवे यांना निवडून द्यावे,असे आवाहन केले...

गेल्या लोकसभेला केंद्रीय मंत्र्याला धूळ चरणारा हाच मतदार संघ आहे.

मागील काही महिन्यापूर्वी झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला पंचावन्न हजाराच्या मताधिक्य याच मतदारसंघातून मिळालेले असून,माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांना याच बहाद्दर जनतेने धूळ चारलेली आहे. त्यामुळे आता देखील तुमच्या हक्काच्या माणसाला विधानसभेत पाठवण्यासाठी महविकाकास आघाडीतील सर्वच पदाधिकारी कार्यकर्ते मतदार यांनी पुन्हा एकदा मनाच्या ठिकाणी खूणगाठ बांधून अधिक अधिक मताधिक्याने निवडून आणले पाहिजे. डॉ खासदार कल्याणराव काळे यांनी सांगितले..

# एमआयएम हाजी शेख जुबेर यांना बीड विधानसभेची उमेदवारी ?

## चाचपणी सुरु, पार्टी लवकरच निर्णय घेण्याची शक्यता

**प्रतिनिधी । परळी**

ऑल इंडिया मजलिस- ए - इत्तेहादुल मुस्लिमीन ( एमआयएम ) महाराष्ट्र विधानसभा निवडणुक स्वबळावर लढवीत आहे. बीड विधानसभा मतदारसंघ जागेसाठी उम्मीदवार देण्याच्या तयारीत असून इच्छुक उमेदवारामध्ये हाजी शेख जुबेर यांचे नाव आघाडीवर असल्याने त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची दाट शक्यता आहे.



बीड येथील सामाजिक कार्यकर्ते हाजी शेख जुबेर यांनी विधानसभा निवडणूक लढवावी अशी मागणी जनतेतून जोर धरत आहे. दरम्यान एमआयएम चे नेते खासदार असदोद्दीन ओवेसी, प्रदेश अध्यक्ष मा.खा. इम्तियाज जलील यांनी संधी दिल्यास आपण बीड विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढण्यास इच्छुक असल्याचे हाजी शेख जुबेर यांनी म्हटले होते. एमआयएमकडून निवडणूक लढण्यास इच्छूकांची संख्या मोठी आहे.

पार्टीकडून इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या परंतु उमेदवार कोण राहणार हे अद्याप जाहीर केलेले नाही. मागील कांही दिवसापासून एमआयएमकडून संभावित उमेदवार म्हणून हाजी शेख जुबेर यांचे नाव समोर येत आहेत. येत्या दोन दिवसात पार्टी आपला उमेदवार जाहीर करणार असून नवा आश्वासक चेहरा देणार असल्याचे खात्री लायक वृत्त आहे. यामुळे नवा चेहरा देण्यासाठी संभावित उमेदवारांची चाचपणी सुरु आहे. यात हाजी जुबेर यांचे नाव समोर येत आहे. यावर पार्टी लवकरच निर्णय घेणार असल्याचे समजते.

**कोण आहेत हाजी जुबेर ?**

हाजी शेख जुबेर हे बीड येथे वास्तव्यात असून सामाजिक क्षेत्रात मोठे नाव आहे. सामूहिक विवाहाचे आयोजन, दान-धर्म, गोर-गरीबांची मदतीसह विविध समाजोपयोगी कार्यात सहभाग नोंदवतात. हिंदू- मुस्लिम एकात्मता अभाधित रहावी यासाठी सदैव प्रयत्न करतात त्यामुळे त्यांना सर्व जाती धर्मातील लोकामधून आदराचे स्थान आहे.




# मनसेची ४ थी यादी जाहीर, श्वेता महालेंविरुद्ध उमेदवार; पुणे, मुंबई, बीड अन् कोल्हापुरात उतरवले शिलेदार

मुंबई : विधानसभा निवडणुकांसाठी उमेदवारांच्या याद्या जाहीर होत असून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या मनसे पक्षाच्या उमेदवारांची ४ थी यादी आज जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये, मुंबई, पुणे, कोल्हापूर, बीड, बुलढाणा आणि बीड जिल्ह्यातील मतदारसंघातून उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशाने महाराष्ट्र विधानसभा २०२४ च्या उमेदवारांची चौथी यादी जाहीर करण्यात येत असून सर्वांनी याची नोंद घ्यावी, असे मनसेच्या अधिकृत ट्विटर हँलडवरुन शेअर करण्यात आलेल्या पत्रात म्हटले आहे. चौथ्या यादीत पुण्यातील आमदार रविंद्र धंगेकर आणि चिखली मतदारसंघातील भाजप आमदार श्वेता महाले यांच्याविरुद्ध मनसेनं उमेदवार मैदानात उतरवले आहेत. मनसेनं आत्तापर्यंत ७० उमेदवारांची नावे जाहीर केली असून जास्तीत जास्त उमेदवार देणार असल्याचं राज ठाकरे यांनी यापूर्वीच जाहीर केलंय. महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाकडून विधानसभा निवडणुकीसाठी तिसरी यादी दोन दिवसांपूर्वी जाहीर करण्यात आली होती. तिसऱ्या यादीत मनसेनं १३ जागांवरील उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. या यादीत विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, पालघर अन् ठाण्यातील उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. विशेष बाब म्हणजे राज ठाकरे यांनी कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात उमेदवार दिला आहे. परळीतून धनंजय मुंडे यांच्या विरोधात मनसेचे अभिजित देशमुख निवडणूक लढवणार आहेत. त्यानंतर, आज चौथी यादी जाहीर करण्यात आली आहे. तत्पूर्वी, ७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. तर, दुसऱ्या यादीतून सर्वाधिक म्हणजेच ४५ उमेदवारांच्या नावांची घोषणा राज ठाकरेंकडून करण्यात आली आहे. राज ठाकरे यांनी यंदाची महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक स्वतंत्रपणे लढवणार असल्याची घोषणा केली होती. त्या प्रमाणं मनसेनं एकला चलोची भूमिका कायम ठेवली आहे. मनसेकडून पहिल्यांदा ७ उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर काल मनसेकडन ४५ उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली . आज मनसेनं १३ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. म्हणजेच मनसेकडून आतापर्यंत ६५ उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये परळी विधानसभा मतदारसंघातून राज ठाकरेंकडून अभिजित देशमुख यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

# विधानसभा मतदार संघासाठी १९ उमेदवारांचे २५ नामनिर्देशन अर्ज दाखल

## आजपर्यंत ३९१ उमेदवारांना ९०४ नामनिर्देशन अर्जाचे वितरण

**प्रतिनिधी । जालना**

जालना-विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२- बदनापूर (अ.जा.) आणि १०३-भोकरदन या पाच विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी आजरोजी १९ उमेदवारांनी २५ नामनिर्देशन अर्ज दाखल केले असल्याची माहिती जिल्हा निवडणूक कार्यालयान दिली आहे.

आज शुक्रवार दि. २५ ऑक्टोबर, २०२४ रोजी ९९-परतूर विधानसभा मतदारसंघासाठी सुरेशकुमार कन्हैलाल जेथलिया (अपक्ष), निळकंठ बाबासाहेब वायाळ (अपक्ष), रामप्रसाद किसानराव थोरात (वंचित बहूजन आघाडी), श्रीराम बन्सीलाल जाधव (जय सेवालाल बहूजन विकास पार्टी) प्रत्येकी एक नामनिर्देशन अर्ज दाखल तर कृष्णा त्रिंबकराव पवार (ऑल इंडिया हिन्दुस्थान पार्टी आणि अपक्ष) यांनी दोन नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहे. तर १००-घनसावंगी विधानसभा मतदारसंघासाठी निसार सुभानखा पठाण (ऑल इंडिया मजलिस ए इत्तेहादूल मुस्लिमीन आणि अपक्ष), गजानन रामनाथ उगले (अपक्ष) यांनी प्रत्येकी दोन नामनिर्देशन अर्ज १०१-जालना विधानसभा मतदारसंघासाठी रंजीत काशिनाथ निकाळजे (अपक्ष) आनंदा लिंबाजी ठोंबरे (अपक्ष), अतुल नारायणराव इंगळे (अपक्ष) संगिता कैलास गोरंट्याल (अपक्ष) प्रत्येकी एक नामनिर्देशन अर्ज १०२- बदनापूर(अ.जा.) विधानसभा मतदारसंघासाठी काकासाहेब बाबूराव भालेराव (अपक्ष), दिपक लक्ष्मण डोंगरे (अपक्ष), चौधरी रुपकुमार नेहरुलाल (नॅशलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार) सुश्मिता निवृत्ती चव्हाण (अपक्ष) यांनी प्रत्येकी एक नामनिर्देशन अर्ज तर १०३-भोकरदन विधानसभा मतदारसंघासाठी रवि विजयकुमार हिवाळे (अपक्ष), कडूबा म्हातारबा इंगळे (अपक्ष), सर्जेराव हरिबा लोखंडे (अपक्ष) प्रत्येकी एक नामनिर्देशन तर चंद्रकांत पुंडलीकराव दानवे (नॅशलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार) यांनी चार अर्ज नामनिर्देशन दाखल केले आहे. याप्रमाणे आज एकुण १९ उमेदवारांनी २५ नामनिर्देशन अर्ज दाखल केले असल्याची जिल्हा निवडणूक कार्यालयाने दिली आहे.आजपर्यंत एकूण ३९१ इच्छुक उमेदवारांना ९०४ नामनिर्देशन अर्जाचे वितरण करण्यात आले आहे. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल करुन घेतले. उमेदवारांना मंगळवार, दि.२९ ऑक्टोबर, २०२४ रोजीपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते ३यावेळेत आपले नामनिर्देशन पत्र सादर करता येणार आहे. तसेच बुधवार, दि. ३० ऑक्टोबर, २०२४ रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येणार असून, सोमवार, दि. ०४ नोव्हेंबर, २०२४ रोजीपर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येणार आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मतदान होणार असून, शनिवार दि.२३ नोव्हेंबर, २०२४ रोजी जाहिर केला जाणार आहे.



**केज विधानसभा मतदार संघाचे नेते श्री रमेश तात्या गालफाडे यांनी मनसे अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांच्या हस्ते आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत प्रवेश केला. राज साहेब ठाकरे यांनी रमेश तात्या गालफडे यांच्याकडे एबी फॉर्म सुपूर्त करून उमेदवारी जाहीर केली यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष सुमंत धस जिल्हा उपाध्यक्ष कल्याण केदार केस तालुका अध्यक्ष अतुल कुलकर्णी आधी उपस्थित होतेशर्मिलावहिनी राजसाहेब ठाकरे यांनी औक्षण करून रमेश तात्या गालफाडे साहेबांना शुभेच्छा दिल्या व ओवाळणीमध्ये आमदारकी द्या अशी मागणी केली.**

# भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोशच्या राज्य उपाध्यक्षपदी सूर्यकांत जोगदंड यांची निवड

केंद्राची मान्यता असलेल्या भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोश संघटनेच्या शासकीय निमशासकीय कर्मचारी सेलच्या राज्य उपाध्यक्षपदी सूर्यकांत जोगदंड यांची निवड संस्थापक अध्यक्ष आयु. भाऊसाहेब कांबळे यांनी केलेली आहे.



कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाविषयी जिल्हा व राज्यभरात त्यांच्या नावाची ख्याती आहे असे सूर्यकांत जोगदंड यांच्या कार्याची दखल घेऊन आयुष्यमान भाऊसाहेब कांबळेसाहेब यांनी त्यांची निवड करून इतर कार्यकारीन्या निवडण्याचे अधिकार दिलेले आहेत. श्री जोगदंड यांचा कर्मचाऱ्यांमध्ये व सामाजिक क्षेत्रात कामाचा आवाका जास्त आहे. ज्यांना या संघटनेमध्ये काम करण्याची इच्छा आहे अशां महिला-पुरुष कर्मचाऱ्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या निवडीबद्दल सल्लागार प्रकाश घोळवे, बालासाहेब सोनवणे, औरंगाबाद विभागाचे अध्यक्ष आयुष्यमान रामदासजी मगरेसाहेब, नितीन भैय्या महूवाले, यशवंत कदम, जिल्हाध्यक्ष सुमेध जोगदंड, मनोज पतंगे, बाळासाहेब डोंगरदिवे, अशोक मसलेकर, सुनील बळवंते, हनुमंत आढागळे, अण्णासाहेब चव्हाण, भारत व राहुल टाकणकार, शब्बीर खान, शेख मंजूर, फिरोज पठाण, प्रकाश तुरुकमारे, दिलीप पूलेवाड आदींनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# संदीप कोतकर यांचा कार्यकर्त्यांशी संवाद; 'एका जत्रेने देव म्हातारा होत नाही', तुम्ही तर खोट्या गुन्ह्यात..

अहिल्यानगर । प्रशांत बाफना

मी आमदार होऊ नये म्हणुन २००९ मध्ये मला एका गुन्ह्यात अडकवण्यात आले. तो माझ्या नशिबाचा भाग आहे. पण याचा परिणाम नगर शहराच्या विकासावर झाला. लोकांना ठरवु द्या कोण कामाचा आहे, तुम्ही तर खोट्या गुन्ह्यात अडकवुन तो ही अधिकार हिरावुन घेत आहात. तांत्रिक बाबी तपासुन एक-दोन दिवसात निवडणुकीचा निर्णय घेईल असे स्पष्ट मत माजी महापौर संदिप कोतकर यांनी व्यक्त केले.

गुरूवारी रात्री उशिरा माजी महापौर संदिप कोतकर तब्बल १२ वर्षानंतर केडगावातील आपल्या निवासस्थानी आले. त्यानंतर उपस्थीत समर्थकांसमोर त्यांनी आपल्या मनातील भावना मोकळ्या केल्या. केडगाव देवी ते निवास्थानापर्यंत संदीप कोतकर यांची रॅली काढण्यात आली. ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. यावेळी ते म्हणाले की, बारा वर्षांपुर्विच मी आमदारकीची तयारी सुरू केली होती. मात्र मी आमदार होऊ नये म्हणुन मला गुन्ह्यात अडकविण्यात आले. याचा परिणाम केडगावसह नगर शहराच्या विकासावर झाला.

मला माझ्या कुंटुबापासून दुर ठेवण्यात आले. तो माझ्या नशिबाचा भाग म्हणुन मी स्विकारले आहे. पण आता निवडणूक लढवायची असल्याने चार - पाच महिन्यांपासून प्रयत्न करीत आहे. मात्र मी निवडणुकीत उभा राहू नये म्हणुन जाणिवपूर्वक माझ्या समोर अडचणी निर्माण केल्या जात आहेत. नगर शहराचा विकास कोण करू शकतो हे लोकांना ठरवु द्या, पण तो ही अधिकार दिला जात नाही असे कोतकर यांनी सांगितले. ते म्हणाले की, नगर शहराच्या गेल्या दहा वर्षांच्या विकासावर स्पष्ट बोलणार आहे. विकास का थांबला याचा उलगडा व्हायला हवा. विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी काही तांत्रिक अडचणी येत आहेत. त्यातुन मार्ग काढुन एक दोन दिवसात याबाबत स्पष्ट निर्णय घेतला जाईल.

एका जत्रेने देव म्हातारा होत नाही

यावेळी संदिप कोतकर म्हणाले की, पूव आम्ही बेसावध होतो म्हणुन आम्हाला अडकविण्यात आले. पण आता आम्ही सावध झालो आहोत. मी आमदार होऊ नये म्हणुन माझ्या समोर अडचणींचा डोंगर उभा केला जात आहे, पण हे लक्षात ठेवा एका जत्रेने देव म्हातारा होत नाही. जे झाले ते झाले आता पुढे असे होणार नाही.

केडगावात आम्ही गुंडगिरी करतो, दहशत करतो असा आरोप केला जातो पण केडगावात आमची गुंडगिरी असती, आम्ही सर्वसामान्य लोकांना त्रास देत असतो तर केडगावचा मोठा विस्तार झाला असता का असा सवाल करून संदिप कोतकर म्हणाले की केडगावकरांना वाऱ्यावर सोडणार नाही. मी महापौर असतांना जी कामे केली ती कामे आजही चांगली आहेत. परंतु, दहा वर्षात शहरात व उपनगरांत कोणाता विकास झाला हे पहावे लागणार आहे. केडगावची पाणी योजना केली. त्या योजनेतून केडगावकरांना दररोज पाणी मिळणे अपेक्षित होते. परंतु आजही केडगावकरांना चार-पाच दिवसाला पाणी मिळतेय. केडगावकरांना दररोज पाणी मिळण्याचे स्वप्न मि पाहिलेय, शहर विकासाचे स्वप्न पाहिलेय ते पूर्ण करण्यासाठी मी वचन बद्ध आहे.

## अनेकांच्या पायाखालची वाळू सरकली; सचिन कोतकर

माजी महापौर निवास्थानी आगमन झाल्यानंतर त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. उपस्थितांना पाहून त्यांना गहिवरुन आले. संदीप कोतकर यांनी संवाद साधल्यानंतर समर्थकांनी आग्रह केल्याने यावेळी सचिन कोतकर यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, कोतकर नगर शहरातुन निवडणूक लढवण्याच्या चर्चेने नगरमध्ये अनेकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. नियतीच्या फेऱ्यातुन आमची गाडी आता बाहेर येत आहे. आमच्यामुळेच नगर शहराची जागा जाहिर होण्यास उशीर लागत आहे. येत्या दोन दिवसांत माजी महापौर संदीप कोतकर योग्य तो निर्णय घेतील असे सांगितले. तसेच शेवटी राम कृष्ण हरी म्हटल्याने कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला.

# बीडच्या मैदानात पँथर उतरला!

## जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांचा अर्ज दाखल



बीडचे राजकीय मैदान गाजवण्यासाठी नितीन सोनवणे रुपी आक्रमक पँथर उतरला आहे ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांचा आज बीड विधानसभेसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला जनसामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी २४ तास उपलब्ध राहणारा युवा नेता म्हणून नितीन सोनवणे यांची जिल्ह्याला ओळख आहे समाजातील सर्व जाती धर्मामध्ये सोनवणे यांचा मोठा मित्र परिवार आहे सोनवणे यांच्या उमेदवारीने बीड विधानसभा क्षेत्रातील जनतेसमोर एक चांगला उमेदवार निवडून योग्य पर्याय निर्माण झाला आहे नितीन सोनवणे यांनी शुक्रवार दिनांक २५ रोजी बीड विधानसभा निवडणुकीसाठी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज सर्व महापुरुषांना अभिवादन करून दाखल केला या प्रसंगी कावेरी जाधव, सूर्यकांत ठोकळ, दीक्षा मीर पगार, कोमल तुरुकमारे, पापाभाई, निसार शेख, सुंदर वाघमारे,रोशन धिवार,प्रशांत पायाळ, सय्यद आतार, उमेश पारिक आकाश शिंदे, व शेकडो कार्यकर्ते पदाधिकारी व समाज बांधवांना च्या उपस्थितीमध्ये अर्ज दाखल केला.

# कुक्कडगाव व चव्हाणवाडी येथील कार्यकर्त्यांनी विजयसिंह पंडित यांना विजयी करण्याचा केला निर्धार

बीड राजयोग प्रतिनिधी

माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित आणि त्यांच्या शिवछत्र परिवाराने कायम लोककल्याणाचाच विचार केला आहे. लोकांच्या सुख-दुःखात शिवछत्र परिवार कायम पुढे असतो या शिवछत्र परिवाराच्याच पाठिशी आम्ही खंबीरपणे उभा राहू आणि विजयसिंह पंडित यांना विजयाचा गुलाल लावू असे प्रतिपादन श्री सरस्वती चिंतामणी विद्यालय, कुक्कडगावचे संस्थापक अध्यक्ष तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोकदादा कुलकर्णी यांनी केले तर गेवराई विधानसभा मतदार संघात विकासाच्या मुद्यावर आपण मतदारासमोर जात असून अमरसिंह पंडित यांच्या संकल्पनेतील विकासाचा आराखडा साकार करण्यासाठी मतदानरुपी आशिर्वाद द्या असे आवाहन विजयसिंह पंडित यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीचे अधिकृत उमेदवार विजयसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थिती कुक्कडगाव, चव्हाणवाडी या गावांतील ग्रामस्थांची कॉर्नर बैठक संपन्न झाली. यावेळी कुक्कडगाव आणि चव्हाणवाडी येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व महायुतीचे अधिकृत उमेदवार विजयसिंह पंडित यांच्या प्रचारार्थ कुक्कडगाव व चव्हाणवाडी येथील कार्यकर्त्यांनी कॉर्नर बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी विजयसिंह पंडित यांना विजयी करण्याचा निर्धार केला. कॉर्नर बैठकीला मार्गदर्शन करताना विजयसिंह पंडित म्हणाले की, आदरणीय शिवाजीराव (दादा) यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कामाचा वसा आणि वारसा शिवछत्र परिवाराला लाभलेला आहे. गेवराई विधानसभा मतदार संघाचा सर्वांगिन विकास झाला पाहिजे ही आमची भुमिका आहे. कोविड सारख्या संकटाच्या काळात मतदार संघातील लोकांना धिर दिला, कोविड सेंटर उभारून आपल्याच भागात उपचाराच्या सुविधा निर्माण केल्या. जनतेच्या सेवेसाठी शिवछत्र परिवार कायम उभा आहे असे सांगून महाराष्ट्राच्या विधानसभेत काम करण्यासाठी एकवेळ संधी द्या, माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या संकल्पनेतील विकासाचा आराखडा साकार करण्यासाठी आणि गेवराई तालुका सिंचनाच्या बाबतीत पुढे आणण्यासाठी मतदानरुपी आशिर्वाद द्या असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुनिल पाटील, माजी सरपंच वचिष्ट कुटे, युवा नेते गणेश तोडेकर, प्रताप माने यांच्यासह अशोकराव लांडे, अशोकराव ढास, समिर सय्यद, भारत मते, गणेश माने, ओम हाटवटे, ग्रा.पं.सदस्य तुकाराम चव्हाण, माजी उपसरपंच प्रकाश गायकवाड, तुळशीदास पवार, शालेय व्यवस्थापन समितीचे नंदकुमार शिंदे, ताहेरभाई, संतोष नवले, अण्णासाहेब शिंदे, अल्ताफ शेख, शहादेव चव्हाण, परमेश्वर चव्हाण यांच्यासह कुक्कडगाव, चव्हाणवाडी व परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी

# देगलूर शहरात मतदार जनजागृती रैलीने शहर दुमदुमले

देगलूर: प्रतिनिधी

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये देगलूर विधानसभा मतदारसंघांमध्ये ५० टक्के पेक्षा कमी मतदान झालेले एकूण २५ मतदान केंद्रात असून त्यापैकी देगलूर शहरांमध्ये एकूण १० मतदान केंद्र आहेत .प्रस्तुत १० मतदान केंद्रात स्वीपद्वारे लक्ष केंद्रीत करण्यात येत असुन या भागात विविध उपक्रम राबवीण्यात येत आहेत.

त्यामुळे देगलूर शहरांमध्ये जास्तीत जास्त मतदार जनजागृती व्हावी तसेच लोकांमध्ये मतदान महत्व व प्रक्रियेविषयी जनजागृती करण्यासाठी भव्य मतदार जन जागृती रैलीचे आयोजन करण्यात आले होते.

देगलूर शहरातील साधना हायस्कूल , सावित्रीबाई फुले हायस्कूल , प. पु . गोळवलकर गुरुजी विद्यालय, पूजा पब्लिक स्कूल , मौलाना आझाद उर्दू स्कूल, ज्ञानसरस्वती इंग्लिश स्कूल व

देगलूर शहरातील सर्व शाळेतील दोन हज़ार विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रस्तुत रैलीमध्ये शहरातील प्रतिष्ठित नागरिक,प्राध्यापक, शिक्षक अधिकारी, कर्मचारी व मतदार उपस्थित होते.



यावेळी तहसीलदार भरत सूर्यवंशी यानी उपस्थित सर्वाना मतदानाची शपथ दिली.व प्रा. बालाजी कतूरवार यानी सर्व विद्यार्थ्यांना आजी आजोबा, आई, वडील, काका काकू व शेजारी याना मतदान विषयी आग्रह धरण्याचे आवाहन केले.

यावेळी गट शिक्षण अधिकारी डी के तोटरे यानी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी स्वीप कक्ष सदस्य , तहसील कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. महात्मा गांधी पुतळा ते तहसील कार्यालय अशी मतदार जनजागृती रॅली काढन्यात आली.

# मुखेड युवा ग्रामीण पत्रकार संघटनेच्या अध्यक्षपदी पांडव मुंगनाळे तर सचिवपदी शिवकुमार बिरादार

मुखेड । प्रतिनिधी

मुखेड - युवा ग्रामीण संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांच्या आदेशान्वये मुखेड येथील जिजाऊ ज्ञान मंदिर येथे युवा ग्रामीण पत्रकार संघाची नूतन कार्यकारणीची निवड करण्यात आली. यात अध्यक्ष म्हणून प्राध्यापक पांडव मुंगनाळे तर सचिव म्हणून शिवकुमार बिरादार यांची निवड करण्यात आली. नूतन कार्यकारणी अशी की संघटक व ज्येष्ठ मार्गदर्शक ज्ञानोबा जोगदंड, उपाध्यक्ष मनोज बिरादार, कोषाध्यक्ष उत्तम वाडीकर, सहसचिव संग्राम पाटील तांदळीकर, सहसंघटक गणेश अकुलवार,ज्येष्ठ सल्लागार गुरुनाथ पेंढारकर यांची निवड करण्यात आली सदरील संघटना सामाजिक घटकांचा न्याय हक्कासाठी सदैव तत्पर





असून यामध्ये शेतकरी, शेतमजूर, निराधार, अपंगत्वाच्या समस्या, व ग्रामीण भागातील सामाजिक प्रश्न आरोग्य, रस्ते,सामाजिक प्रश्नाबाबत समस्या निवारणासाठी आपल्या बातमीच्या माध्यमातून वाचा फोडणारी आहे या निवडी बद्दल समाज माध्यमातून आनंदाचा वर्षाव होत आहे तसेच संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश जी कचकलवार यांनी या कार्यकारणी निवडीचे स्वागत केले आहे.

# करन्सीच्या सौद्याने नागवडे फेकले गेले बॅकफूटवर

## १३८ कोटींवर पाणी फेरणाऱ्या राहुल जगतापांच्या पदरी काय? उमेदवारीच्या आदलाबदलीत पटाईत असणाऱ्या दलालांचा वापर चिंताजनक

लोकसभा निवडणूक निकालानंतर महाविकास आघाडीसाठी अलबेल वातावरण निर्माण झालं. त्याची हवा विशषेत: काँग्रेस आणि शिवसेना उबाठा गटातील नेत्यांच्या डोक्यात गेली. त्यातूनच सौदेबाजी सुरू झाली. मुख्यमंत्री मीच होणार आणि मीच उमेदवारी देणार असल्याने माझे नाव सुचविणार असणार असाल तर उमेदवारी देतो, असा सौदा नानांनी सुरू केला अन् दुसरीकडे उबाठा गटात उमेदवारी मिळविण्यासाठी खोक्यांच्या जोडीने स्कीन करन्सीचा वापर झाला. शरद पवार यांना याची संपूर्ण माहिती मिळत असूनही त्यांना काहीच बोलता आले नाही. श्रीगोंद्याची जागा कोणतेच मेरीट नसताना संजय राऊतांनी आकंडतांडव करत पदरात पाडून घेतली अन् सेनेसह मविआतील घटक पक्षांशी काडीचाही संबंध नसणाऱ्याला उमेदवारी देऊन (विकून!) टाकली! श्रीगोंद्यातील स्कीन करन्सीचा सौदा बाहेर आल्यानंतर त्याचे पडसाद संपूर्ण जिल्हाभरात उमटले! साजन पाचपुतेच्या माध्यमातून ही सौदेबाजी अनेकांच्या जिव्हारी लागली. २५ खोक्यांमध्ये झालेल्या व्यवहारात पैसे हेच मेरीट पाहिले गेले असले तरी त्याचा परिणाम आता मविआच्या जिल्ह्यातील सर्वच जागांवर होणार हे नक्की!

खस्ता खात पक्षाशी एकनिष्ठ राहिल्यानंतरही सणसणीत चपराक कशी बसते आणि त्यातून तोंड कसे झोडावे लागते याचे उत्तम उदाहरण म्हणजे माजी आमदार राहुल जगताप हे झालेत! लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान माजी आमदार राहुल जगताप यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून बोलावणे झाले. अजित पवारांच्या निवासस्थानी जगताप-पवार यांच्यात बैठक झाली. त्या बैठकीला जिल्ह्यातील पवार गटाचे एक आमदार देखील उपस्थित होते. लोकसभा निवडणुकीत भाजपा उमेदवार सुजय विखे यांना मदत करण्याबाबतची भूमिका राहुल जगताप यांनी घ्यावी अशी विनंती वजा भूमिका अजित पवार यांनी मांडली. त्याबदल्यात कुकडी कारखान्याला राज्य शासनाकडून १३८ कोटी रुपयांची मदत करण्याची आणि तसे आदेश लागलीच काढण्याबाबतही अजित पवार यांनी आश्वासीत केले. रक्कम १३८ लाख नव्हे तर १३८ कोटींची होती.

राहुल जगताप यांनी त्याक्षणाला कारखान्याचे हित पाहून अजित पवार यांच्या भूमिकेला होकार देणे अपेक्षीत होते. त्यातून कारखान्यासमोरील अडचणी सुटल्या असत्या आणि स्वत:च्या पदरात आणखी काही बरेच पडले असते. मात्र, स्वाभिमानी जीवन जगलेल्या कुंडलिकराव जगताप यांच्या संस्कारांची शिदोरी पदरी असणाऱ्या राहुल जगताप यांनी अजित पवार यांची ही १३८ कोटी रुपयांची ऑफर नम्रपणे नाकारली! दादांची माफी मागत त्यांनी आपण शरद पवार साहेबांसोबत राहणार असल्याची स्पष्ट भूमिका मांडली. यानंतर मुंबईतून बाहेर पडलेल्या राहुल जगताप यांनी तडक श्रीगोंदा गाठले आणि नीलेश लंके यांच्या प्रचारात स्वत:ला झोकून दिले. श्रीगोंद्यातून लंके यांना मोठे मताधिक्य देण्यात ज्यांनी- ज्यांनी भूमिका बजावल्या त्यात राहुल जगताप यांची भूमिका ही निर्णायक राहिली.

विधानसभेचे वारे वाहू लागल्यानंतर श्रीगोंद्यातून राहुल जगताप हाच आमचा उमेदवार असणार असल्याचे सांगताना त्याच्या निष्ठेचे कौतुक थेट शरद पवार, जयंत पाटील यांनी केले. साखर कारखान्याकडून उस उत्पादकांना देय असणाऱ्या रकमेबाबत डांगोरा पिटवला जात असला तरी ही रक्कम किती आणि ज्यांना ही रक्कम द्यायची ते उत्पादक श्रीगोंदा- नगर तालुक्यातील अवघे दोनशे! बाकीचे ऊस पुरवठा करणाऱ्या अन्य तालुक्यातील! मात्र, असे असताना या शेतकऱ्यांना त्यांची देणी देण्याची व्यवस्था राहुल जगताप यांनी केली. शरद पवार हे स्वत: आपल्या पाठीशी असल्याने राहुल जगताप यांनी संयमी भूमिका घेत रणनिती तयार केली.

महाविकास आघाडीकडून राहुल जगताप यांचे नाव अंतिम होतेय असे लक्षात आल्यानंतर राजेंद्र नागवडे यांनी नेहमीप्रमाणे प्यादे टाकण्यास प्रारंभ केला. कारखान्याचे व्हाईस चेअरमन असणाऱ्या बाबासाहेब भोस यांना त्यांनी आधी गळाला लावले. साजन पाचपुते याला काष्टीचा सरपंच करण्यात राजेंद्र नागवडे यांचीच भूमिका होती. साजन पाचपुते याला राजेद्र नागवडे यांनी प्यादा म्हणून वापरले. त्याचा वापर करत थेट मातोश्रीची एंट्री मिळवली! संजय राऊतांची 'व्यवस्था' आधीच साजनकडून झाली होती. आदलाबदलीत पटाईत असणाऱ्या दलालांचा वापर त्या झाला आणि लागलीच दुसऱ्या क्षणाला नागवडेंच्या हाती एबी फॉर्म! एखाद्या प्रख्यात जादुगाराला लाजवेल असे सारे घडले! सांगलीत जे घडले अगदी तसेच श्रीगोंद्यात घडले. सादेबाजीत आपल्याला उमेदवारी मिळाली नसल्याची खात्री पटताच स्वाभिमानी राहुल जगताप यांनी बंडाचे निशान फडकवले.

जोडीला काँग्रेसच्या घनश्याम शेलार यांनीही तेच केले. लोकसभेच्या वेळी १३८ कोटी घेतले असते तर लोकसभेचे निकाल वेगळा लागला असता. मात्र, स्वाभिमानी बाणा जपणाऱ्या राहुल जगताप यांनी तसे केले नाही. प्रामाणिक राहूनही उमेदवारी टाळली आणि ज्यांनी विरोधात काम केले त्यांना उमेदवारी दिली गेली. यातून राहुल जगताप समर्थकांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आणि त्याची किंमत नागवडेंना मोजावी लागणार हे नक्की! साजन पाचपुते यांनी हा खेळ उभा केला असला तरी त्यांना गमवायचे काही नाही, कारण त्यांच्याकडे गमवण्यासारखे काहीच नाही! काष्टीचे सरपंचपद असले तरी त्यांच्याविरोधात आताच मोठा असंतोष आहे. कोणत्याही क्षणी त्यांची 'खाट' पडू शकते. स्कीन करन्सी अन् खोक्याचा वापर करत उमेदवारी मिळविणाऱ्यांना आणि उमेदवारी मिळवून देणाऱ्यांना मतदारसंघात प्रचारासाठी फिरताना जाब विचारला जाणार हे नक्की!